विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९८ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | २ |
| पृष्ठे | : | ३५ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : २२**

विद्या प्रसारक मंडळाचे मासिक

# दिशा

वर्ष तिसरे / अंक २ / ऑगस्ट १९९८

## संपादकीय

### पुन्हा स्वातंत्र्यासाठी लढा. . .

भारतीय स्वातंत्र्याला या वर्षी पन्नास वर्षे पुरी झाली. या निमित्ताने अनेक सोहळे, समारंभ यांचे आयोजन होत आहे. वैयक्तिक किंवा सामाजिक जीवनामध्ये वाढदिवसांना आज महोत्सवाचेच स्वरूप आले आहे. पन्नास वर्षांचे स्वातंत्र्य उपभोगल्यावर आजची भारतीय परिस्थिती बघता, महोत्सवापेक्षा थोडा वेळ थांबून आत्मपरीक्षण करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. भारताचा स्वातंत्र्याचा आग्रह हा काही शाश्वत मूल्यांवर आधारीत होता. पारतंत्र्यात अशा मूल्यांचा विकास होत नाही असाही त्याचा अर्थ होता. पण हा सिद्धांत फसवा आहे. स्वातंत्र्य म्हणजे जसा स्वैराचार नाही तसेच स्वातंत्र्य म्हणजे सरकारी सवलतींचा आणि फुकटेगिरीचा पाऊसही नाही. स्वातंत्र्य म्हणजे भयाने निर्माण केलेली सुरक्षाही नाही किंवा 'अनियंत्रण' ही नाही. स्वातंत्र्य म्हणजे बेजबाबदार मानवी अधिकारही नाही. संन्यास किंवा एकांतवास हाही स्वातंत्र्याचा उपाय नाही. स्वातंत्र्य ही वस्तूही नाही किंवा स्वातंत्र हा जाहीरनामाही नाही. स्वातंत्र्य, एक सांस्कृतिक मूल्य आहे. संस्कृतीला प्रवाही आणि अपरिवर्तनीय असे दोन्हीही पदर असतात. चारित्र्यहीन, मूल्यहीन संस्कृती ही स्वार्थी, अप्पलपोटी स्वैराचारी समाज 'स्वातंत्र्या'च्या गोंडस नावाखाली निर्माण करते. अशा पंजगेतून फुकटा, सवलतग्रस्त, लाचार आणि मिंधा समाज तयार होतो. प्रज्ञा आणि विवेक हे स्वातंत्र्याचे मूळ खांब जाऊन त्यांची जागा बुद्धी आणि वासना यांनी घेतली जाते.

आजच्या 'स्वातंत्र्या'चा वाढदिवस हा खरा 'परकीय' सत्ता म्हणजे 'पारतंत्र्य' संपल्याचा वाढदिवस आहे. वर सांगितल्याप्रमाणे 'पारतंत्र्य' संपणे म्हणजे 'स्वातंत्र्य' मिळणे अशी जी फसवी समजूत होते तीच चुकीची आहे. आजच्या भारताच्या परिस्थितीने हेच दाखवून दिले आहे. संस्कृतिहीन किंवा उसन्या संस्कृतीवर जगणारा समाज, स्वतंत्र आणि सशक्त प्रजातंत्र निर्माण करू शकत नाही. केवळ संख्याबळ हेच आधार असलेली लोकशाही ही 'लोकसभाप्रधान' प्रजातंत्र निर्माण करू शकते पण स्वातंत्र्य जपू शकत नाही. आज आपल्याला दिसत असलेली सर्व आघाड्यांवरील दिवाळखोरी ही संख्याबळ या एकाच निकषावर उभ्या राहिलेल्या लोकशाहीचे अपत्य आहे. इथे पात्रतेपेक्षा अपात्रतेला मान आहे. नीति पेक्षा अनितीचा आदर आहे. त्यागापेक्षा भोगाला किंमत आहे आणि संयमापेक्षा बळाचा विजय आहे. सत्यापेक्षा ढोंगाला समाजप्रतिष्ठा आहे. सर्व राजकीय पक्षांचे या बाबतीत एकमत आहे. केंद्रापासून पंचायतीपर्यंतचे सर्व लोकप्रतिनिधी आज लोकशाही पद्धतीनेच निवडून आले आहेत. ते कोणी परकीय नाहीत तर स्वकीयच आहेत. भ्रष्टाचार, एकाधिकार शाही, भाटगिरी ही चढत्या भाजणीने आज स्वातंत्र्याच्या पन्नासाव्या वाढदिवशी पराकोटीला पोचली आहेत. परकीयांपेक्षा स्वकीयांचाच जुलूम अधिक दाहक असतो. रावण आणि कौरव हे सुद्धा स्वकीयच होते. रशियामधला झार, फ्रान्समधील किंवा चीनमधील राजसत्ता हीसुद्धा स्वकीयांचीच होती आणि तेथे जेव्हा स्वकीयांचा जुलूम पराकोटीला पोचला तेव्हा क्रांती घडली. आणि म्हणूनच परकीयांची सत्ता जाणे म्हणजे स्वातंत्र्य मिळणे हा समज चुकीचा आहे. परकीयांपेक्षा अधिक पारतंत्र्यात स्वकीय तुम्हाला ठेवू शकतात. आजची भारताची परिस्थिती ही नुसतीच भयावह नाही तर भीषण आहे. सत्ता टिकवण्याकरीता चाललेला राजकारण्यांचा निर्लज्जपणा उबग आणणारा आहे. आज एका नवीन स्वातंत्र्यलढ्याला सुरुवात करण्याची गरज आहे. आणि हा लढा परकीयांविरुद्ध नसून स्वकीयांविरुद्धच आहे. लाचार व्यक्ती सवलती मिळवितात तर माणसाची निरपेक्षता आणि त्याग त्याला स्वातंत्र्य मिळवून देतो.

• • •



विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष तिसरे / अंक २ / ऑगस्ट १९९८

**संपादक**
डॉ. विजय वा. बेडेकर

**सहसंपादक**
श्री. प्रकाश ल. वैद्य

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ,
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

**वार्षिक देणगी**
रु. २०० / -

**मुद्रक :**
परफेक्ट प्रिण्टस्,
२२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड,
ठाणे - ४०० ६०१.

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. विजय वा. बेडेकर | मुखपृष्ठ |
| २) सुभाषित | प्रा. (डॉ) मोरेश्वर दि. पराडकर | ३ |
| ३) भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१८) प्रासादाचे वर्गीकरण | डॉ. र.पु. कुलकर्णी | ५ |
| ४) भारत देशा जागा हो | प्रा. य. भ. भिडे | १४ |
| ५) सन २०४७ची भारताची बखर | श्री. विश्वनाथ शेंडे | १८ |
| ६) इतिहासाच्या दर्शनाने पुनीत झालेले क्षण | कु. आरती वाकळे | २१ |
| ७) ऋषिप्रज्ञेचा हृद्य आविष्कार नासदीय सूक्त-ऋग्वेद १०.१२९ | डॉ. प्र.वि. पाठक | २३ |
| ८) 'प्रोजेक्ट' बनविण्यासाठी ग्रंथालय साहाय्य | सौ. भारती जोशी | २५ |
| ९) मला झपाटून टाकणारे पुस्तक 'मेड इन जपान, अकियो मोरिटा आणि सोनी' | श्री. वासुदेव देशपांडे | २७ |
| १०) आजचे युवा मानस | नेत्रा जोशी | २९ |
| ११) २१व्या शतकातील भारतापुढील आव्हाने | श्री. गणेश खराडे | ३१ |
| १२) महाविद्यालयीन वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३३ |

# लेखक - परिचय

१. ***डॉ. विजय वा. बेडेकर***
वैद्यक व्यावसायिक, अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था आणि चळवळींशी निगडित, अध्यक्ष - प्राच्यविद्या अभ्यास संस्था, भारत सहकारी बँक, सत्य शोध संस्था; अनेक परिसंवादांचे संयोजन, संशोधनपर लिखाण, *शोध अंधश्रध्देचा* या पुस्तकाचे लेखक.

२. ***प्रा. (डॉ) मोरेश्वर दि. पराडकर***
संस्कृत आणि हिंदी भाषेचे पंडित, अनेक वर्षे संस्कृतचे अध्यापन; आणि प्राचार्य म्हणून पेंढारकर कॉलेज, डोंबिवली मधूननिवृत्त. बंबई हिंदी विद्यापीठाचे मानद कुलपती; संस्कृत,इंग्रजी, हिंदी आणि मराठी मधून विपुल संशोधनपर लिखाण. *स्तबक* या पुस्तकाचे लेखक.

३. ***श्री. रघुनाथ पु. कुलकर्णी***
अभियंता म्हणून शासकीय सेवेतून निवृत्त. प्राचीन भारतीय शिल्पशास्त्राचा विशेष अभ्यास व संशोधन. अभियांत्रिकी संशोधन पत्रिकांतून अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध. *काश्यपसंहिता* या शिल्पशास्त्रावरील संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर. प्राचीन वास्तुशास्त्रावर हिंदी, मराठी व इंग्रजीत ग्रंथरचना.

४. ***प्रा. य.म. मिडे***
प्राध्यापक, ना.गो. बेडेकर महाविद्यालय, ठाणे. सामाजिक चळवळीत सहभाग.

५. ***श्री. विश्वनाथ शेंडे***
ग्रंथपाल , प्राच्य विद्या अभ्यास संस्था, ठाणे. सामाजिक व ऐतिहासिक विषयांवर लेख प्रकाशित.

६. ***आरती बाकळे***
तृतीय वर्ष, के.ग. जोशी कला महाविद्यालय, ठाणे. निबंध लेखन व वाचनाची आवड.

७. ***डॉ. प्रमोद वि. पाठक***
आय.आय.टी. ,मुंबई येथून एम.टेक.(केमिकल) पदवी प्राप्त. ते व्यावसायिक रसायनतज्ञ आहेत. भारतीय संस्कृती व सिंधुसंस्कृती या दोन्ही क्षेत्रांत त्यांनी मूलभूत संशोधन केले आहे. ऋग्वेदातील सर्वात मुख्य असणाऱ्या वृत्रवधकथेच्या मिथ्यकथेवर त्यांनी आधुनिक भूवैज्ञानिक संकल्पनेच्या आधारे प्रकाश टाकला आहे. या विषयावरील प्रबंधासाठी मुंबई विश्वविद्यालयाने त्यांना पीएच.डी. ची पदवी दिली. ऋग्वेद, अथर्ववेद आणि सिंधुसंस्कृती यांचा परस्पर संबंध दाखविणाऱ्या त्यांच्या संशोधनाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली.

८. ***सौ. भारती जोशी***
मराठी या विषयात M.A. असून ग्रंथालयशास्त्रातील पदवीधारक आहेत. वाचनाची आवड व ग्रंथालयाचा अधिकात अधिक उपयोग करण्यासाठी त्या सदैव प्रयत्न करतात.

९. ***श्री. वासुदेव देशपांडे***
तृतीय वर्ष, ना.गो. बेडेकर महाविद्यालय, ठाणे. वाचनाची आवड, वक्तृत्व स्पर्धेत सहभाग.

१०. ***नेत्रा जोशी***
तृतीय वर्ष, वि.ग. वझे कला महाविद्यालय, मुलुंड. गायन व साहित्यामध्ये विशेष रस.

११. ***श्री. गणेश खराडे***
तृतीय वर्ष, के.ग. जोशी कला महाविद्यालय, ठाणे. वक्तृत्व व निबंध स्पर्धेमध्ये सहभाग.

१२. ***प्रा. मोहन पाठक***
गेली २०-२२ वर्षे वि.प्र. मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सेवा, मराठी व ग्रंथपालन शास्त्राचे गेली १६ वर्षे अध्यापन. मुंबईच्या साहित्य संघातून 'साहित्य विशारद' ही पदवी प्राप्त. १९७५ पासून सातत्याने अनेक नियतकालिकांतून विविध विषयांवर विपुल लेखन. ठाण्यातील साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांशी घनिष्ठ संबंध.

प्रिया न्याय्या वृत्तिर्मलिनमसुभंगेऽप्यसुकरं
असन्तो नाभ्यर्थ्याः सुहृदपि न याच्यः कृशधनः ।
विपद्युच्चैः स्थेयं पदमनुविधेयं च महतां
सत्तां केनोद्दिष्टं विषममसिधाराव्रतमिदम् ॥ १ ॥

दौर्मन्त्र्यान्नृपति र्विनश्यति यतिः संगात्सुतो लालना
द्विप्रोऽनध्ययनात्कुलं कुतनयाच्छीलं खलोपासनात् ।
ह्रीर्मद्यादनवेक्षणादपि कृषिः स्नेहः प्रवासाश्रया
मैत्री चाप्रणयात्समृद्धिरनयात्त्यागात्प्रमादाद्धनम् ॥२॥

गीर्भिर्गुरूणां परुषाक्षराभि
स्तिरस्कृता यान्ति नरा महत्त्वम्
अलब्धशाणोत्कषणा नृपाणां
न जातु मौलौ मणयो वसन्ति ॥ ३ ॥

मुख्यये पुरस्कृत्य शून्यात्मानोऽपि साधकाः ।
भवन्ति तं विना नैव यथा संख्याङ्कबिन्दवः ॥४॥

न भ्रूणां स्फुरणं न चच्चुवलनं नो चूलिकाकम्पनं
न ग्रीवाचलनं मनागपि न यत्पक्षद्वयोत्क्षेपणम् ।
नासाग्रेक्षणमेकपादमनं कष्टैकनिष्ठं परं
यावत्तिष्ठति हीनमीन वदनस्तावद्बकस्तापसः ॥५॥

## डॉ. मो. दि. पराडकर

१) संस्कृत वाङ्मयात श्लोकांची शंभरी म्हणजे शतके सादर करणारे अनेक कवी. त्यांत तीन शतके लिहून आपले नाव अजरामर करणारा कवी राजा भर्तृहरि. याच्या नीतिशतकातला हा श्लोक. प्रिया म्हणजे सर्वांना आवडणारी न्यायाला अनुसरून असलेली वागणूक असणे, असुभंगे म्हणजे प्राण संकटात सापडले तरी मलिन म्हणजे काळवंडलेले कृत्य किंवा पाप न करणे शब्दशः असुकरं म्हणजे सहज किंवा सोपे नसणे, जे लोक चांगले नाहीत म्हणजे ज्यांचा दर्जा हलका आहे त्यांच्यापुढे 'अभ्यर्थना' याचना न करणे, थोडक्यांत त्यांची हांजी हांजी न करणे आणि कृशधन म्हणजे पैसे कमी असलेली व्यक्ती मित्र असली तरी त्याच्यापाशी याचना न करणे हे गुण पहिल्या दोन ओळींत सांगितले. यांपैकी एकेकही माणसाच्या व्यक्तिमत्वाला उंची आणून देणारा ठरेल. शिवाय तिसऱ्या ओळीत संकटातही आब ठेवून रहाणे (उच्चैःस्थेयं) किंवा मोठेपणा राखून असणे आणि 'महतां पदम्' म्हणजे थोरामोठ्यांच्या पावलावर पाऊल ठेवून चालणे यांचा उल्लेख सूक्तिकाराने केला. हे सगळे संभाळणे खरोखरच 'असिधाराव्रत' म्हणजे तलवारीच्या धारेवर चालण्यासारखे आहे; हे व्रत सत्पुरुष नेहमीच करतात; परंतु त्यांना कोणी सांगितले असा प्रश्नच या सूक्तिकाराने चौथ्या ओळीत विचारला. हा प्रश्न 'Breaths there the man with soul is so dead' या धर्तीवर आहे. उत्तर प्रश्नातच आहे; सत्पुरुषांना कोणी हे व्रत करा असा उपदेश केलेला नसतो; कारण तो त्यांचा स्वभावच असतो.

२) दुसरा श्लोकही नीतिशतकांतला. यात राजा भर्तृहरीने आपल्या अनुभवाच्या जोरावर व्यक्तीचा नाश कोणत्या दुर्गुणामुळे होतो हे नमूद करून ठेवले. तो म्हणतो, 'राजाचा नाश दुष्ट सल्ल्यामुळे (किंवा असा सल्ला देणाऱ्या मंत्र्यामुळे), यतीचा स्त्री संगामुळे किंवा मोहात अडकल्यामुळे होतो; मुलगा अतिलाडामुळे बिघडतो आणि कुळ किंवा वंश कुपुत्रामुळे नष्ट होते. ब्राह्मणाच्या (विप्राच्या) नाशाला कारण अभ्यास किंवा व्यासङ्ग न करणे. अध्ययनाच्या जोरावरच पूर्वकाळी ब्राह्मणाला मान होता; त्याला 'भूसुर' म्हणजे पृथ्वीवरील देवता म्हणत असत. खलोपासना म्हणजे दुष्ट व्यक्तींची सेवा, यामुळे शीलच नाहीसे होते हा वस्तुतः फार मोठा तात्त्विक विचार आहे. 'खलाराधने नासे शील' हा निबंधाचा विषय आहे. मद्यपानामुळे लाज (-ह्री) नाहीशी होते हाही अनुभवच. शेती दुर्लक्ष (अनवेक्षण) केल्यामुळे फोफावत नाही आणि परस्परांमधील स्नेह (दूरच्या) प्रवासामुळे कमी व्हावा; हे मैत्री प्रणयाच्या अभावामुळे म्हणजे नम्रतेने प्रेम न केल्यामुळे कोमेजते. 'प्रणय' चा संस्कृतमध्ये प्रेम किंवा याचना असाही अर्थ होतो हे लक्षात ठेवले पाहिजे. प्रणाम हा वाकून म्हणजे नम्रतापूर्वक करावयाचा असतो. समृद्धीच्या नाशाला कारण अनय म्हणजे अनीती. ऐश्वर्याचा

भंग अनीतीमुळे होतो आणि संपत्तीचाही नाश ढिलाईमुळे (प्रमाद) आणि अव्हेर केल्यामुळे होतो हे सांगायलाही हा अनुभवी राजा विसरत नाही. नीतिशतकाला यामुळेच साहित्याचे जाणकार फार महत्त्व देतात. या शतकाचे मराठीत भाषांतर स्व. स.गं. मालशे यांनीही केले.

३) आयुष्यात कधी कधी घरच्या आणि दारच्या थोर व्यक्तींकडून ऐतखाऊपणाचा किंवा कर्तृत्वशून्यतेचा धिक्कार झाला म्हणजे अपमानित व्यक्ती ईर्ष्येने पेटून उठते आणि सत्त्व दाखविण्यासाठी उद्योगाची कास धरून उन्नतीचे शिखर गांठताना दिसते. गुरूणां परुषाक्षरः गीर्भि : म्हणजे थोर लोकांच्या वाक्ताडना मुळे शब्दशः कठोर अक्षरे असणाऱ्या वाणीमुळे (शब्दांमुळे) धिक्कार झाल्यानंतर माणसांना महत्पदावर पोचण्याची प्रेरणा मिळते. शिवराजभूषण लिहिणारा कवि भूषण आणि पेशवाईतील रामशास्त्री ही याची उदाहरणे. याला दृष्टांत फार सुंदर दिला. नृपाणां मौली म्हणजे नृपतीच्या मस्तकावर मणी विराजमान होतात हे खरे परन्तु सहाणेवर (शाण) घासले गेल्याच्या (उल्कषण) अनुभवातून गेल्याशिवाय (अलब्ध) हे होत नाही; म्हणजेच मण्यांनाही पैलू पाडावे लागतात आणि मग त्यांना राजमुकुटात स्थान मिळते. सहाणेवर घासले जाणे आणि थोरामोठ्यांकडून अपमानित होणे यांतले साम्य मोठे मार्मिक आहे.

४) या श्लोकात खरा नेता कसा असतो याचे खुबीदार चित्र रेखाटलेले आहे. एक मोठा माणूस (मुख्यमेकं) पुढाकार घ्यायला किंवा अग्रभागी रहावयास तयार झाला की मग साधक म्हणजे अनुयायी जरी पोकळ असले, त्यांच्यांत फारसा दम नसला तरी काम साधता येते, बाजी मारता येते; कारण संजीवन देण्यासाठी तो पुढारी असतो. यामुळे निःसत्त्वांना हि यश मिळू शकते, नव्हे मिळते. त्याच्याशिवाय मात्र अनुयायी दुबळे म्हणजे दुसऱ्या ओळीत सांगितल्यामुळे संख्येमध्ये एका आकड्यापुढे असणारी शून्ये(बिन्दवः) सुरवातीला एक, दोन हे अंक असले तर पुढच्या शून्यांना किंमत येते; एरवी शून्येच ती. नेत्याच्या अभावी सामान्यांची (या श्लोकात साधकांची) तीच स्थिती. छत्रपती शिवाजी महाराजांचे नेतृत्व लाभल्यामुळे विळा आणि कोयता वापरणारे मावळे शूर शिपाई बनले, त्यांनी मर्दुमकी गाजवून शत्रूच्या सैन्याचा पराभव केलाच ना.

५) हा श्लोक म्हणजे बकान्योक्ती. 'बकध्यान' हा शब्द मराठीत रूढ आहे. स्वार्थासाठी एकाग्रतेचे, तपश्चर्येचे नाटक करणाऱ्या बगळ्याचे या श्लोकात सुंदर वर्णन केलेले आहे. भुवयांचे थोडे सुद्धा स्फुरण नाही. चोच (चञ्चू) हलत नाही. चूलिका म्हणजे तुरा अगदी निश्चल. मानेचेही चलनवलन नाही. दोन्ही पंखांची फडफडही नाही. नाकाच्या टोकावर दृष्टी. मोठ्या कष्टाने एक पाय दाबून उभे रहाण्याची पद्धत. पण हे सगळे बगळ्याचे तप तोंडात मासा पकडेपर्यंतच असते. म्हणजे बिचाऱ्या माश्याची शिकार करण्यासाठी एवढे मोठे नाटक हा बगळा करीत असतो. जगात अशी नाटके करणारे दांभिक, अनेक लोकांना लुबाडण्यासाठी, भोळ्याभाबड्या व्यक्तींना जाळ्यात ओढण्यासाठी एकाग्रता, निःस्पृहता, धार्मिकता यांचे मुखवटे घालणाऱ्या या व्यक्ती आपण आहोत त्यापेक्षा वेगळेच आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न करीत असतात आणि पुष्कळ वेळा यशस्वीही होतात. अशा तऱ्हेचे सोंग करणाऱ्यांना मराठीत 'बोकेसंन्यासी' आणि हिन्दीत 'बगुला भगत' म्हणतात. कधीकधी या सोंगामुळे जाणकारही फसतात आणि कळते त्या वेळेला वेळ निघून गेलेली असते. या श्लोकात ज्याचे वर्णन केले तो बगळा यांचा प्राणिसृष्टीतील प्रतिनिधी म्हणूनच या श्लोकाला 'अन्योक्ती' ही संज्ञा देणे योग्य.

• • •

Bhushan S. Sawant

SAI COURIER SERVICES

Sunish Apartment, Near Durga Hotel,
Kisan Nagar-2,
Wagle Estate, Road No. 16,
Thane-400 604.
Tel. : 530 276 51

# भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१८)
# प्रासादांचे वर्गीकरण

डॉ. र. पु. कुलकर्णी

प्रासादांचे, भारतीय देवालयांचे, वर्गीकरण हा काहीसा जटिल विषय आहे. प्रासादांचे वर्गीकरण अनेक प्रकारांनी करता येतें. त्यात पुन्हा एकाच प्रकारच्या वर्गीकरणाची माहिती अनेक शिल्पशास्त्राच्या ग्रंथांत पुष्कळदा परस्पर विरुद्ध विधानांनी भरलेली असते आणि त्यामुळे वाचकाचा गोंधळ उडतो. प्रासादांचे वर्गीकरण आधुनिक अभ्यासक देशपरत्वे व पुन्हा राजवंशपरत्वे करतात. विदर्भातील देवालये प्रदेशानुसार देवालयांचा केलेला वर्ग परंतु पुन्हा त्यांत विदर्भातील राष्ट्रकूट वंशातील राजांनी बांधलेली देवालये असा पुन्हा भेद केला जातो. कर्णाट देशातील (कर्नाटक राज्यातील) प्रासाद , पण त्यात पुन्हा चोळ वंशाच्या राजांनी बांधलेले, असे प्रासादांचे भेद अगर वर्गीकरण या विषयातले आधुनिक अभ्यासक करतात. प्रासादांच्या या प्रकारच्या वर्गीकरणाची माहिती येथे देण्यात आलेली नाही.

भारतीय शिल्पशास्त्रज्ञांनी प्रासादांचे वर्गीकरण कसे केले आहे त्याची माहिती पुराण, आगम व शिल्पशास्त्रावरील ग्रंथ यांत दिली आहे. तिची थोडक्यात झलक येथे देण्यात येईल. शिल्पशास्त्रावरील ग्रंथांतही प्रासादांचे वर्गीकरण 'अपराजितपृच्छा' या नागर शैलीच्या देवालयांची माहिती देणाऱ्या पुस्तकाला अनुसरून दिली आहे. थोडक्यात म्हणजे प्रासादाच्या वर्गीकरणाबद्दल शिल्पशास्त्रीय अनेक ग्रंथांत जी मतमतांतरे दिली आहेत त्यांची दखल येथे घेतलेली नाही.

प्रासादांच्या वर्गीकरणाचा पहिला उल्लेख पुराणांत मिळतो. प्रथमतः म्हणजे पुराणकाळी देवालयांचे वर्गीकरण त्यांच्या आकारानुसार केले गेले. अग्नि व गरुड या दोन्ही पुराणांत देवालयांचे या पद्धतीचे वर्गीकरण दिले आहे. देवालये, त्यांच्या अधोच्छंदानुसार[१] चौरस, आयत, वर्तुळ, वृत्तायत[२] व अष्टकोनी अशा पाच प्रकारांत , आकारांनुसार विभागता येतात. यातील चौरसाकृति अधोच्छंद असलेल्या देवालयांना 'वैराज' प्रकारचे देवालय म्हणतात.

या विभागात एकूण नऊ प्रकारची देवालये येतात. त्याचप्रमाणे आयताकृती अधोच्छंद असलेली देवालये 'पुष्पक' प्रकारची समजतात. त्यांचे देखील नऊ प्रकार आहेत. कैलास, माणिक व त्रिविष्टप ही नावे अनुक्रमे वर्तुळाकार, वृत्तायताकार व अष्टकोनी आकाराच्या देवालयांच्या प्रकारांची आहेत. येथे देखील या प्रत्येक प्रकारच्या देवालयांचे नऊ प्रकार होतात. या पाच गुणिले नऊ म्हणजे ४५ देवालयांची नांवे खाली कोष्ठकाच्या स्वरूपात दिली आहेत.

**कोष्ठक - १**
**प्रासादांचे आकारानुसार वर्गीकरण**
**प्रासाद**

| चौरस | आयत | वर्तुळ | वृत्तायत | अष्टकोनी |
|---|---|---|---|---|
| वैराज | पुष्पक | कैलास | माणिक | त्रिविष्टप |
| १ मेरू | वलभी | वलय | गज | वज्र |
| २ मन्दर | गृहराज | दुन्दुभि | वृषभ | चक्र |
| ३ भद्र | शालागृह | पद्म | हंस | स्वस्तिक |
| ४ सर्वतोभद्र | मन्दिर | महापद्म | गरूत्मन | वज्रस्वस्तिक |
| ५ रूचक | विशाल | वर्द्धनी | ऋक्षनायक | चित्र |
| ६ नन्दक | ब्रह्ममंदिर | उष्णीव | भूषण | स्वस्तिखड्ग |
| ७ नन्दी | भुवन | शंख | भूधर | गदा |
| ८ वर्धमान | प्रभव | कलश | श्रीजय | श्रीकण्ठ |
| ९ श्रीवत्स | शिबिका | खवृक्ष | पृथ्वीजय | विजय |

या अनेक प्रासादांची याहून जास्त माहिती पुराणांत दिलेली नाही. या देवालयांचा आकार, अधिष्ठानापासून ते थेट वरच्या कळसापर्यंत असलेल्या सर्व अवयवांचा आकार, सर्वत्र एकच असावा असे एक अनुमान काढावे लागते. वैराज प्रकारच्या देवालयांच्या अधिष्ठान, भिंत अथवा खांब, प्रस्तर, गल, शिखर व कळस ही सर्व चौरस आकाराची असावयास हवी. तसेच कैलास प्रकारच्या देवालयांची ही अंगोपांगे वर्तुळाकार असतात असे म्हणावयाचे. अग्नि तसेच गरूड ही पुराणे उत्तर भारतीय म्हणजे नागर प्रकारच्या देवालयांची माहिती देतात. तेव्हा हे देवालयांचे वर्गीकरण फक्त नागर प्रासादांसाठी वापरता येण्यासारखे आहे असे म्हणावयास हवे. अर्थात ही सर्व गृहीते आहेत. या देवालयांच्या शिखराबद्दल कांही माहिती दिलेली नाही. तेव्हा या सर्व निरनिराळ्या आकाराच्या देवालयांची शिखरे नागर पद्धतीच्या प्रासादांप्रमाणे असावीत असे म्हणावे लागते. याचाच अर्थ शिखराचा आकार, चौरस, वृत्ताकार, किंवा अष्टकोनी असो, हा नेहमी कमळाच्या कळीसारखा असतो. अपराजितापृच्छात दिल्याप्रमाणे हे सर्व नागर प्रासादाचे प्रकार आहेत.

अर्थात जी देवालये आयताकृती असतात, ज्यांना वर पुष्पक प्रकारचे प्रासाद म्हटले आहे, त्यांचे शिखर गोलाकृति (barrel vault) असणार. या देवालयाचे प्रवेशद्वार सर्वसाधारणपणे त्याच्या लांबीच्या मध्यभागी असते व दंडगोलाकृति शिखराच्या दोन्ही बाजू या उभट, सरळसोट असतात. मद्रासजवळील महाबलिपुरम् येथील भीमरथ या प्रकारचा आहे. किंवा जर प्रवेशद्वार रुंदीच्या (कमी लांबीच्या) बाजूवर असेल तर त्या प्रासादाच्या शिखराची समोरची बाजू जरी उभी असेल तरी मागील बाजू एक तर पुढील बाजूप्रमाणे उभी सरळसोट असेल अगर या मागील बाजूचा आकार हत्तीच्या पाठीमागील बाजूप्रमाणे (हस्तिपृष्ठाकृति) असेल. मात्र पुष्कळदा अशा देवालयांचा अधोच्छंद मागच्या बाजूला अर्धवर्तुळाकृति असतो. अशा आकाराच्या अधोच्छंदाला ध्वत्रवृत्त असे म्हणतात. परंतु वर दिलेल्या वर्गीकरणावरून असे वाटते की आयताकार प्रासाद रुंदीहून लांबीचे माप मोठे व चारी कोपरे काटकोनात अशाच प्रकारचे असावेत. त्यांत ध्वत्रवृत्तचा म्हणजे लांबी रुंदीहून जास्त, पुढच्या बाजूला काटकोनांत असलेले दोन कोपरे (ध्वत्र) व मागच्या बाजूला अर्धवर्तुळाकृति व शिखर हस्तिपृष्ठाकृति अशा प्रासादांचा पुष्पक प्रकारच्या देवालयांमध्ये समावेश नसावा. मात्र वृत्तायत आकाराच्या प्रासादांची नावे आहेत गज, वृषभ, हंस, गरुत्मन, ऋक्षनायक वगैरे तेव्हा अशा म्हणजे x ध्वत्रवृत्त आकाराच्या देवालयांचा अंतर्भाव माणिक प्रकारच्या प्रासादांत होऊ शकेल.

प्रासादांच्या वर्गीकरणाचा दुसरा प्रकार आहे. वर वर पाहता या वर्गीकरणात अखिल भारतीय पद्धतीच्याच देवालयांना लागू होईल असा या वर्गीकरणाचा प्रकार नाही. या वर्गीकरणात प्रासादाच्या आकाराप्रमाणे प्रादेशिक वर्गीकरण अंतर्भूत केले असल्याने तसे वाटते. परंतु वस्तुतः हे फक्त द्राविड अथवा दक्षिण भारतीय देवालयांचे वर्गीकरण आहे असे दिसून येते. या वर्गीकरणाप्रमाणे भारतीय प्रासाद हे तीन प्रकारांत मोडतात. नागर, द्राविड व वेसर. येथे हे प्रथमच सांगावयास हवे की देवालये जरी फक्त तीनच प्रकारांत विभागली असली तरी ज्या शिल्पशास्त्राच्या ग्रंथांत या वर्गीकरणाची माहिती दिली आहे त्यांच्या वर्णनांत एकोपा नाही; ती परस्परविरुद्ध स्वरूपाची व त्यामुळे गोंधळ निर्माण करणारी आहेत. काश्यपशिल्पात दिले आहे की 'हिमालय ते विंध्याद्रि या प्रदेशातील प्रासाद नागर पद्धतीचे असतात; व कृष्णा -वेण्णा नद्या ते कन्याकुमारीपर्यंतच्या प्रदेशांत जे प्रासाद आहेत ते वेसर प्रकारचे आहेत. शिल्परत्न या शिल्पशास्त्राच्या ग्रंथांत नागर, द्राविड व वेसर या प्रासादांचे देशपरत्वे वर्गीकरण काश्यप शिल्पांत दिल्याप्रमाणे आहे. परंतु काही आगम ग्रंथांत हिमालय ते विंध्यपर्वत या प्रदेशांत नागर प्रासाद, विंध्यपर्वत ते कृष्णानदी या प्रदेशातील देवालये वेसर पद्धतीची व कृष्णा नदी ते कन्याकुमारी या प्रदेशातील देवालये द्राविड पद्धतीची असतात असे वर्णन केलेले आढळते. तेव्हा द्राविड व वेसर प्रकारच्या देवालयांच्या प्रदेशाबाबत शिल्पशास्त्रीय ग्रंथांत उलट सुलट मत प्रदर्शित केलेले दिसते.

वेसर म्हणजे खेचर, एक नपुंसकलिंगी प्राणी.

तेव्हां द्राविड प्रकारच्या प्रासाद व नागर प्रासाद यांच्या मिश्रणाने जो प्रासादांचा प्रकार होतो त्याला वेसर प्रासाद म्हणतात. नागर प्रासादांची माहिती देणारी समरांगण सूत्रधार, अपराजितपृच्छा, दीपार्णव इत्यादि शिल्पशास्त्रविषयक पुस्तके उपलब्ध आहेत. काश्यपशिल्प, शिल्परत्न, मानसार, मयमत इत्यादी पुस्तकांत द्राविड पद्धतीच्या देवालयांची सांगोपांग माहिती मिळते. परंतु वेसर प्रकारच्या देवालयांची माहिती देणारा एकही शिल्पशास्त्रविषयक ग्रंथ नाही किंवा उपलब्ध नाही. त्यामुळे वेसर प्रकारचे देवालय म्हणजे प्रासादाचा नेमका कोणता प्रकार याची निश्चिती न होता त्याबाबत अनेक मतांतरे दिसून येतात.

काश्यप तसेच शिल्परत्न या ग्रंथांत या प्रासादांची नागर, द्राविड व वेसर पद्धतीच्या प्रासादांची जी लक्षणे दिली आहेत ती खाली कोष्ठकात एकत्रित करून दिली आहे.

कोष्ठक-२

नागर, द्राविड व वेसर प्रासादांची लक्षणे

| लक्षण | नागर | द्राविड | वेसर |
|---|---|---|---|
| गुण | सात्विक | राजस | तामस |
| देश | हिमालय ते विंध्याद्री | विंध्याद्री ते कृष्णा नदी | कृष्णा ते कन्याकुमारी |
| लिंग | पुं | स्त्री | नपुंसक |
| भूषण | काही नाही | भोग,वीर,नृत्य | वाहने सैन्य |
| कूटकोष्ठावे | मानसूत्राच्या | मानसूत्राच्या | समसूत्रांत |
| निर्गमन | बाहेर नाही | बाहेर | |
| कूटाचा आकार | चौरस | चौरस,अष्टकोनी गोल निरनिराळ्या मजल्यांना | गोल |
| अधिष्ठान, ग्रीवा कंठ, शिखर | एक आकाराचे चौरस | निरनिराळ्या आकाराचे चौरस,अष्टकोनी, अथवा गोल | वर्तुळाकार वृत्तायत, घटाकार |

कोष्ठकात दिलेल्या माहितीवरून समजून येते की हे वर्गीकरण ज्यास द्राविड प्रासाद म्हणतो त्याचेच आहे. द्राविड प्रासादाचे हे तीन प्रकार आहेत. थोडक्यात अग्नि, गरुड वगैरे पुराणांत जसे नागर प्रासादांचे त्यांच्या आकारांनुसार वैराज, पुष्पक वगैरे प्रकार दिलेले आहेत. तसेच नागर, द्राविड व वेसर हे द्राविड प्रासादांचे त्यांच्या आकारानुसार होणारे प्रकार आहेत आणि हे वर्गीकरण द्राविड प्रासादांपुरतेच सीमित असून ते अखिल भारतीय देवालयांचे वर्गीकरण नाही. एकदा हा मुद्दा लक्षांत आला म्हणजे हे वर्गीकरण समजण्यास सोपे जाते.

दक्षिण भारतात सगुण स्वरूपी देवाची भक्ती करून मोक्ष कसा मिळवावा याची माहिती देणारे ग्रंथ आहेत. त्यांना आगम किंवा संहिता म्हणतात. देवाच्या सगुण स्वरूपाच्या भक्तीत देवाची मूर्ती व तिची जेथे स्थापना करावयाची तो प्रासाद यांची गरज लागते. तेव्हा त्यांची शिल्पशास्त्रीय माहिती या ग्रंथांत दिली आहे. हे ग्रंथ कधी लिहिले गेलेत याची निश्चित कल्पना नाही. परंतु ते इ.स. आठव्या किंवा नवव्या शतकांत लिहिले गेले असावेत असा एक मतप्रवाह आहे. येथे नागर, द्राविड व वेसर ही देवालयांची वर्गीकरणाची पद्धत अनुसरली आहे. मात्र त्यात पुन्हा प्रत्येक ग्रंथलेखकाचे वेगळेच मत अशी स्थिती असल्याने पुन्हा गोंधळ उडतो. तेव्हा त्यातल्या त्यात जी तर्कशुद्ध माहिती रौरवोत्तरागमांत दिली आहे. ती येथे देतो. येथे पुन्हा लक्षात आणून देणे आवश्यक आहे की हे वर्गीकरण फक्त द्राविड म्हणजेच दक्षिण भारतीय देवालयांचे आहे.

देवालयांचे सहा प्रमुख प्रकार आहेत. नागर, द्राविड, वेसर, नागर-द्राविड, नागर-वेसर व द्राविड-वेसर. प्रासादांचे हे वर्गीकरण पुन्हा त्यांच्या आकारांनुसार करण्यात आले आहे. ज्या देवालयाचा अधिष्ठानापासून कळसापर्यंत आकार चौरस आहे ते नागर प्रकारचे देवालय. ज्या देवालयांचा अधिष्ठानापासून ते कळसापर्यंत सर्व सहाही वर्गांचा आकार अष्टकोनी व वर्तुळाकृती असतात ती अनुक्रमे द्राविड व वेसर प्रकारची देवालये असतात. या नंतरचे तीन प्रकार या तीन प्रमुख देवालयांच्या मिश्रणामुळे होतात. ज्या देवालयाचा अधिष्ठान ते

प्रस्तरापर्यंत आकार चौरस व गल, शिखर व स्तूपी अष्टकोनी असतात ते नागर-द्राविड प्रासाद. ज्या देवालयाचा अधिष्ठान ते प्रस्तरापर्यंत आकार चौरस व गल, शिखर व स्तूपी वर्तुळाकृति असतात ते द्राविड-वेसर प्रकारचे देवालय. येथे वेसर हा प्रासादाचा स्वतंत्र वर्ग आहे. तो नागर (उत्तर भारतीय) व द्राविड (दक्षिण भारतीय) प्रकारच्या देवालयांच्या शैलीच्या मिश्रणाने होत नाही, ही बाब येथे मुख्यतः लक्षात घ्यावयास हवी.

पुन्हा लक्षात ठेवण्यासारखी दुसरी बाब म्हणजे वैराज, कैलास व त्रिविष्टप प्रकारची देवालये अधिष्ठानापासून स्तूपीपर्यंत अनुक्रमे चौरस, वर्तुळाकार व अष्टकोनी असतात तरीही त्यांना नागर, द्राविड व वेसर पद्धतीची देवालये म्हणता येणार नाही. याचे कारण असे की वैराज, कैलास व त्रिविष्टप ही देवालये नागर शैलीचे म्हणजे भिंतीपासून वर गलापर्यंत कमळाच्या कळीप्रमाणे शिखर असलेली असतात. याउलट नागर, द्राविड व वेसर हे वर्गीकरण मजल्यांच्या व घंटाकृती शिखर असलेल्या द्राविड शैलीच्या देवालयांना लागू होते. तेव्हा याबाबत घोटाळा नसावा.

यानंतर देवालयाच्या वर्गीकरणाचा जो तिसरा प्रकार अपराजितपृच्छा या उत्तर भारतीय शैलीच्या प्रासादांची माहिती देणाऱ्या शिल्पशास्त्रविषयक ग्रंथांत दिला आहे तो कसा वर्णिला आहे ते पाहू. अपराजितपृच्छा हा बाराव्या शतकातील ग्रंथ भुवनदेवाचार्याने लिहिला असून तो नागर शैलीच्या देवालयावरील प्रमाण ग्रंथ मानला जातो. तसे पाहू जाता हा शिल्पशास्त्रावरचा ज्ञानकोश आहे असे म्हटले तरी चालेल. मंडन सूत्रधाराने १४व्या शतकात जे वास्तुमंडन, प्रासादमंडन, राजवल्लभ वगैरे शिल्पशास्त्रविषयक अनेक लहान ग्रंथ लिहिले आहेत त्यासाठी माहिती अपराजितपृच्छा या सर्वमान्य ग्रंथातून घेतली अशी स्वच्छ कबुली त्याने या आपल्या ग्रंथांत दिली आहे.

अपराजितपृच्छात दिल्याप्रमाणे प्रासादांचे एकूण १५ प्रकार होतात. त्यांतील पहिले आठ प्रमुख असून उरलेले सात प्रकार या मूळ आठ प्रकारच्या प्रासादांवरून घेतलेले आहेत. देवालयांचे हे प्रकार त्यांच्या शिखरावरून निरनिराळ्या शैलींमुळे होतात. या प्रासाद प्रकारांची नावे आहेत : १) नागरच्छंद २) द्राविड ३) मिश्रक ४) विमान ५) भूमिज ६) सांधार ७) वराट ८) लतिन ९) वलभी १०) फांसनाकार ११) सिंहावलोकन १२) दारूज १३) विमान-नागर-छंद १४) विमान पुष्पक १५) रथारूढ.

प्रासाद हे प्रामुख्याने चौरस, आयताकार, वर्तुळाकार, वृत्तायताकार व अष्टकोनी असतात. वर दिलेल्या प्रासादांच्या प्रकारांत नागर, मिश्रक व ललित प्रकारचे प्रासाद हे या पांचही आकारांमध्ये बांधतात. द्राविड, भूमिज व फांसनाकार प्रासाद चौरस, वर्तुळाकार व अष्टकोनी आकाराचे बांधतात. ते कधीही आयताकार किंवा वृत्तायताकार नसतात. सांधार, वराट, सिंहावलोकन, दारूज, विमाननागर तसेच विमानपुष्पक प्रकारचे प्रासाद फक्त चौरसाकार असतात. वलभी प्रासाद हा फक्त आयताकारांत बांधतात. कोष्ठक ३ मध्ये ही माहिती एकत्रित करून दिली आहे.

**कोष्ठक ३**

**प्रासादाचा प्रकार व आकार**

| प्रासादाचा आकार | प्रासादाचा प्रकार |
|---|---|
| चौरस | नागर ते रथारूढ या १५ही प्रकारचे प्रासाद या आकाराचे असतात. |
| आयताकार | नागर, मिश्रक लतिन व वलभी |
| वर्तुळाकार | नागर, द्राविड, मिश्रक, लतिन, भूमिज व फांसनाकार |
| वृत्तायताकार | नागर, मिश्रक व लतिन |
| अष्टकोनी | नागर, द्राविड, मिश्रक, लतिन, भूमिज व फांसनाकार |

प्रासादांच्या अधिष्ठानाचे थरविभाग त्यांच्या प्रकारानुसार वेगळे असतात. नागर प्रकारच्या अधिष्ठानाचे थरविभाग आहेत : जाड्यकुंभ, कर्णिका, ग्रासपट्टी,

गजपीठ, अश्वपीठ व नरपीठ. द्राविड प्रासादाच्या अधिष्ठानाचे थरविभाग आहेत. जाड्यकुंभ, कर्णक, अंतरपत्र, वेदिका आणि पुन्हा अंतरपत्र भूमिज प्रकारच्या प्रासादाच्या अधिष्ठानाचे थरविभाग हे नागर व द्राविड पद्धतीच्या अधिष्ठानांच्या थर विभागांच्या मिश्रणाने तयार होतात. हे थर विभाग आहेत जाड्यकुंभ, कर्णक, अंतरपत्र, ग्रासपट्टी व नरथर अथवा नरपीठ. गजपीठांत हत्तींची रांग असते. अश्वपीठ व नरपीठांत अनक्रमे घोडे व मनुष्ये याची रांग असते. ग्रासपट्टीत सिंहमुख, ज्याला कीर्तिमुख देखील म्हणतात, त्यांची रांग असते.

नागर पद्धतीचे अधिष्ठान लतिन, सांधार, मिश्रक, विमान व रथारूढ (आणि कदाचित विमाननागर व विमानपुष्पक) प्रकारच्या देवालयांना असते. द्राविड पद्धतीचे अधिष्ठान फांसनाकार प्रकारच्या प्रासादाला असते व भूमिज पद्धतीचे अधिष्ठान वराट, वलभी, दारूज व सिंहालोकन या प्रासाद प्रकारांना वापरता येते.

अधिष्ठानाची उंची देखील त्या त्या प्रासादाच्या प्रकारावरून ठरते. या बद्दलची माहिती खाली कोष्ठक ४ मध्ये दिली आहे.

### कोष्ठक ४

#### प्रासादाचा प्रकार व अधिष्ठानांची उंची

| प्रासादाचा प्रकार | अधिष्ठानांची उंची | नियम लागू होणारे प्रासादांचे प्रकार |
|---|---|---|
| नागर | प्रासादांच्या रुंदीवर अवलंबून असते. | नागर,लतिन, सांधार, मिश्रक, विमान, रथासह (व बहुधा विमान नागर व विमान पुष्पक) |
| द्राविड | रुंदीच्या निम्मे असते. | फांसनाकार |
| भूमिज | १) शिखराच्या उंचीच्या निम्मे असते<br>२) अधिष्ठान ते स्तूपी याच्या उंचीच्या $^{१}/_{१६}$ असते. | वलभी आणि दारूज |
| वराट | अधिष्ठान ते स्तूपी यांच्या उंचीच्या $^{१}/_{१०}$ किंवा $^{१}/_{११}$ असते. | |

प्रासादाच्या स्तंभवर्गाची किंवा भिंतीची उंची देखील प्रासाद प्रकारांप्रमाणे निरनिराळी असते. त्याविषयीची माहिती कोष्ठक ५ मध्ये दिली आहे.

### कोष्ठक ५

#### प्रासादाचा प्रकार व भिंतीची उंची

| प्रासादाचा प्रकार | भिंतीची उंची | नियम लागू होणारे प्रासादांचे प्रकार |
|---|---|---|
| नागर | प्रासादांच्या रुंदीवर अवलंबून असते. | मिश्रक , सांधार, लतिन मिश्रक, विमान नागर, विमान पुष्पक, दारूज, व रथासह |
| द्राविड | अधिष्ठानाच्या वरपासून प्रस्ताराच्या वरपर्यंत जी उंची ती प्रासादाच्या रुंदीइतकीच असते. | द्राविड, भूमिज, विमान व वराट |
| सिंहावलोकन | प्रासादाच्या रुंदीच्या निम्मे असते. | |

प्रासादांच्या भिंतीवरील नक्षीकाम देखील प्रासादप्रकारावर अवलंबून असते.

नागर व भूमिज प्रासादांच्या भिंतीच्या थर विभागांची माहिती कोष्ठक ६ मध्ये दिली आहे.

### कोष्ठक ६

#### नागर व भूमिज प्रासादांच्या भिंतींचे थरविभाग व त्यांच्या उंचीचे प्रमाण

| | नागर प्रसाद | भूमिज प्रकार |
|---|---|---|
| थरविभाग | उंची(भागामध्ये) | उंची(भागामध्ये) |
| कुंभक | $२०^{२०}/_{१३१}$ =०.१४४ | $१^{१}/_{२४}$ =०.१६ |
| कलश | ८ =०.०५७ | $^{१}/_{२}$ =०.०८ |
| अंतःपट्ट | $२^{१}/_{२}$ =०.०१८ | $^{१}/_{२}$ =०.०४ |
| कपोतालि(अ) | ८ =०.०५७ | $^{१}/_{२}$ =०.०८ |
| मंचिका | ९ =०.०६४ | $^{१}/_{२}$ =०.०८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| जंघा | ३५ | =०.२५२ | २ | =०.३२ |
| उद्‌गम | १५ | =०.१०८ | -- | |
| भरणी | ८ | =०.०५७ | $^{१}/_{२}$ | =०.०८ |
| शिरावटी | ५ | =०.०३६ | $^{१}/_{२}$ | =०.०८ |
| पट्ट | ५ | =०.०३६ | $^{१}/_{२}$ | =०.०८ |
| कपोतालि(ब) | ८ | =०.०५७ | -- | |
| पट्ट | २$^{१}/_{२}$ | =०.०१८ | $^{१}/_{२}$ | =०.०८ |
| कूटच्छाद्य | १३ | =०.०९३ | $^{१}/_{८}$ | =०.०१२ |
| | एकूण १३९ भाग | | एकूण ६$^{१}/_{४}$ भाग | |

भूमिज प्रासादाच्या भिंतीतील थरविभाग हे नागर प्रासादांतील थरविभागांप्रमाणेच असतात. मात्र त्यांत उद्‌गम व कपोतालि(ब) हे थरविभाग नसतात. तसेच भिंतींच्या एकूण उंचीशी थरविभागांच्या उंचीचे प्रमाण नागर प्रासादांत व भूमिज प्रासादांत वेगळे वेगळे असते हे देखील कोष्टक ६ वरून दिसून येईल.

द्राविड प्रासादाच्या भिंती थरविभागांत विभागलेल्या नसतात. मात्र त्यांच्यावर उत्कृष्ट मूर्तिकाम केलेले असते व या मूर्ति ज्या कोनाड्यांत बसविलेल्या असतात ते अत्यंत रुचिपूर्ण सजविलेले असतात. तंजावर येथील बृहदीश्वराच्या मंदिराच्या भिंती अशा अनेक मूर्तींनी सौंदर्यपूर्ण केल्या आहेत. कोनाड्यांवर अनेक प्रकारची तोरणे देखिल आहेत. भिंतीच्या अलंकरणाबद्दल म्हणता येईल की नागर प्रासादाप्रमाणे भिंतीची अनेक थरांत विभागणी ही मिश्रक, सांधार, लतिन, विमान-नागर, विमान-पुष्पक व रथासह प्रकारच्या प्रासादांत देखील केलेली असते. तसेच भूमिज प्रासादातील भिंतींच्या थरविभागाप्रमाणे थरविभाग वलभी व दारूज प्रकारच्या प्रासादांतील भिंतींमध्ये असावेत. द्राविड प्रकारची भिंतींची नक्षी विमान, वराट व फांसनाकार प्रकारच्या प्रासादांच्या भिंतींवरही करत असतील याविषयी निश्चित माहिती अपराजितपृच्छांत दिलेली नाही.

याशिवाय नागर, द्राविड व भूमिज प्रकारच्या देवालयांच्या गर्भागारांतील दरवाजाची मापे त्या त्या प्रासादाच्या रुंदीवर अवलंबून असून निरनिराळी असतात. पण त्यांची माहिती येथे देत नाही. तसेच प्रासादाच्या शिखराची उंची प्रासाद प्रकारावर अवलंबून असते. नागर प्रासादाच्या शिखराची उंची त्याच्या अधिष्ठान व भिंत यांच्या एकत्रित उंचीच्या १$^{१}/_{२}$ पट असते. मिश्रक, सांधार, लतिन व बहुधा विमाननागर व विमानपुष्पक प्रकारच्या प्रासादांच्या शिखरावरच्या उंचीला हाच नियम लागू होतो. द्राविड प्रासादाच्या बाबतीत त्याच्या एकूण उंचीतून अधिष्ठान व स्तूपी यांची उंची वजा केली तर उरलेली उंची व प्रासादाची रुंदी यांचे गुणोत्तर १.४ म्हणजेच $\sqrt{2}$ असते. द्राविड प्रासादाच्या उंचीचा हा नियम भूमिज, वराट व विमान प्रकारच्या प्रासादप्रकारांना लागू होतो. तसेच तो वलभी व फांसनकार प्रासादांकरताही वापरता येतो.

प्रासादांचे वरीलप्रमाणे केलेले वर्गीकरण हे त्यांच्या रुंदीच्या मापांवर बरेचसे अवलंबून आहे. तसेच त्यांच्या वर्गीकरणासाठी त्यांच्या निरनिराळ्या अवयवांची मापे माहीत असणे आवश्यक आहे. पण त्याशिवायही हे प्रासाद ओळखण्यासाठी त्यांची काही व्यवच्छेदक लक्षणे लक्षात ठेवली तर दिलेल्या प्रासादाचे वर्गीकरण करणे फारसे अवघड जाणार नाही. निरनिराळ्या प्रासादप्रकारांची त्यांना ओळखण्यासाठी जी अनेक व्यवच्छेदक लक्षणे आहेत ती थोडक्यात खाली दिलेली आहेत.

१) नागर प्रासाद :-

अ) नागर प्रासादाच्या शिखराची उंची, अधिष्ठान व भिंत यांच्या एकत्रित उंचीपेक्षा जास्त असते. शिखर तळमजल्याच्या भिंतींच्या वरपासून सुरू होते आणि त्याच्या वर गल किंवा ग्रीवा व आमलसार हे अवयव येतात. शिखराचा आकार मिटलेल्या कमळाप्रमाणे किंवा कमळकळीप्रमाणे असतो. आ) मूळ शिखरावर (मूल मंजिरी) उरुशृंग, प्रत्यंग, तिलक व रथिका ही भूषणे असतात. नागर प्रासादांत हे सर्व अलंकार असतात, कमीत कमी एक तरी भूषण असतेच. इ) शिखराच्या अर्ध्या किंवा पाऊण उंचीवर शुकनास, अंतराळ

मंडपाच्या शिखराचा भाग असतो. येथे सर्वात वरती सिंहमूर्ति असते. ई) नागर प्रासादाची म्हणून सांगितलेल्या कपोतालि, मंचिका, जंघा, उद्गम, भरणी वगैरे थरविभागांनी भिंत भूषविलेली असते. उ) भिंतीचा सर्वात वरचा थरविभाग कूटछद्याचा असतो. ऊ) शिखरावरती आमलसार व कळस असतो. उदा. खजुराहो येथील मंदिरे. नाशिक येथील काळाराम मंदिर.

## २) द्राविड प्रासाद :-

अ) हा प्रासाद अनेक मजली असतो. एक ते बारा (काही वेळा सोळा पर्यंत) मजले असतात. प्रत्येक मजल्याला खांब व प्रस्तर हे विभाग (वर्ग) असतात. खांबाच्या म्हणजेच भिंतीच्या भागावर कूट, कोष्ठ, पंजर इत्यादींचे अलंकरण केलेले असते. आ) वरती घंटेच्या आकाराचे शिखर असते. त्याचा आकार चौरस, गोल किंवा अष्टकोनी असतो. या शिखराच्या खाली गलवर्ग व त्याच्या खाली गलाचाच अवयव म्हणून वेदिकेचा थरविभाग असतो. इ) एक मजली द्राविड प्रासाद त्र्यंग प्रकारचा असतो. तीन मजली प्रासाद पंचांग प्रकारचा व पाच मजली प्रासाद सप्तांग पद्धतीचा असतो. सात मजली प्रासाद नवांग प्रकारचा असतो. ई) भिंतीवर बाहेरच्या बाजूला कुड्यस्तंभ दाखवितात व त्यांच्या मधील अंतरात अलंकारिलेल्या कोनाड्यांत मूर्ति असतात. भिंती आतून (व कांही वेळेला बाहेरून देखील) भूषण विरहित असतात. उ) प्रस्तरावरील उत्तर थरावर तसेच अधिष्ठानावरील कपोत थरावर मकर, सिंहमुख वगैरे एका रांगेत कोरलेले असतात. ऊ) द्राविड प्रासादाच्या शिखराची रुंदी सोळा भाग असेल तर उंची दहा भाग असते. (रुंदी /उंची = १.६). शिखराचे प्रमुख थरविभाग असतात. अंतःपत्र -१ भाग, पट्टिका) १/२ भाग, कर्ण- १/२ भाग, स्कंधपट्टि १ भाग, स्कंध-६ भाग. उंचीचे एकूण नऊ भाग केलेले असतात. घंटेवर अनेक नासिका असतात. उदा. बृहदीश्वराचे मंदिर, तंजावर.

## ३) मिश्रक प्रासाद :-

मिश्रक प्रकारच्या मंदिरामध्ये नागर, द्राविड व भूमिज प्रासादांच्या अंगोपांगांची सरमिसळ केलेलीअसते. खाली दिलेल्या कोष्टकावरून (कोष्टक ७) ही अवयवांची रचना कशी असी शकते याची कल्पना येईल.

**कोष्टक ७**

**मिश्रक प्रासादाच्या वर्गांची सरमिसळ**

| अधोच्छंद | अधिष्ठान | भिंत | शिखर |
|---|---|---|---|
| नागर | -- | नागर | विमान |
| नागर | नागर | द्राविड | विमान |
| द्राविड | द्राविड | वराट | भूमिज |
| भूमिज | -- | भूमिज | द्राविड |
| भूमिज | -- | भूमिज | द्राविड |
| भूमिज | -- | भूमिज | वराट |


## ४) विमान प्रासाद :-

अ) शिखरावरती अनेक भूमी असतात. भूमि-आमलाच्या थरविभागाने या मजल्यांचा बोध होतो. भूमि-आमला म्हणजे आमल साराच्या आकाराचा थरविभाग. आ) जणू काही फुलांचे हार लटकत आहेत असे शिखराचे अनेक भूमींनी अलंकरण केलेले असते. इ) शिखरावर उत्कृष्ट नक्षीकाम केलेली लता असते. ई) वरती घंटेच्या आकाराचे शिखर नसून ग्रीवा व आमलसार असतात. अर्थात शिखर भिंतीच्या वरपासून ग्रीवा वर्गापर्यंत असते. उदा. ओरिसा राज्यातील देवालये. राजराणी मंदिर.

## ५) भूमिज प्रासाद :-

अ) शिखरावरती मंदिराच्या भिंत व शिखर (शृंग) यांच्या प्रतिकृतींची आडवी त्याचप्रमाणे उभी रांग असते. आडव्या रांगांच्या संख्येने शिखरावरील भूमींची संख्या ठरविली जाते. आ) जेवढी भूमींची संख्या तितक्याच अंगांचा तो प्रासाद असतो. भूमी तीन किंवा पाच असतील तर प्रासादाचा अधोच्छंद अनुक्रमे त्र्यंग व पंचांग पद्धतीचा असतो. तसेच भूमींची संख्या सात किंवा नऊ

असेल तर प्रासाद अनुक्रमे सप्तांग व नवांग प्रकारचा असतो. इ) शिखराच्या प्रत्येक बाजूवर उत्कृष्ट नक्षीकाम केलेली लता असते. ई) वरती घंटाकृती शिखर असते. उदा. सिन्नर येथील गोंडेश्वराचे (गोविंदेश्वराचे ) देवालय; अंबरनाथ येथील शिवालय.



आकृती १ भूमिज प्रासाद

**६) सांधार प्रासाद:-**

अ) हा प्रासाद मुख्यतः नागर प्रकारचा असून त्याला प्रदक्षिणामार्ग असला की सांधार प्रासाद म्हणतात. (प्रदक्षिणा मार्ग नसलेल्या प्रासादाला निरंधार म्हणतात.) आ) या प्रकारच्या मंदिराची कमीत कमी रुंदी दहा हात (जवळ जवळ पाच मीटर) असते. इ) हे प्रासाद पर्वताप्रमाणे लांबून दिसतात.

**७) वराट प्रासाद :-**

अ) हा भूमिज प्रासादाप्रमाणे असतो. मात्र येथे शिखरावर शृंगांच्या रांगा असतात. त्या शृंगाखाली भिंती नसतात. आ) याच्या कर्ण, भद्र, प्रतिभद्र वगैरे अंगांवर देखिल शृंगे असतात. इ) याच्या वरती असलेल्या घंटाकृती शिखराची रुंदी १२ भाग असेल तर उंची नऊ भाग असते. (रुंदी /उंची = १ १/३). या शिखराच्या उंचीचे समान तीन विभाग केले असता खालची एकतृतीयांश उंची अष्टकोनी असते, मधली एक-तृतीयांश सोळा कोनी व वरची एकतृतीयांश उंची ३२ कोनी असते. यालाच मंदार पुष्पाच्या आकाराची घंटा म्हणतात.

भूमिज व वराट प्रासाद हे वेसर प्रकारचे म्हणावयास हरकत नाही. यांच्या शिखराचा आकार नागर प्रासादाच्या शिखराप्रमाणे असतो परंतु वरती पुन्हा घंटा असते. खाली शृंगांनी शिखराची आडव्या विभागांत विभागणी केलेली असते. मात्र या प्रासादांत उरुशृंग वगैरे नागर प्रासादाची भूषणे नसतात.



आकृती २-लतिन प्रासादाचे शिखर

**८) लतिन प्रासाद :-**

अ) नागर प्रासादाप्रमाणे शिखर असते. परंतु ही मूलमंजिरी उरुशृंग, तिलक, रथिका इत्यादी भूषणांनी अलंकारिलेली नसते. आ) शिखराच्या प्रत्येक बाजूचे उंचीत तीन किंवा पाच विभाग होतात. अशा प्रासादाचा अधोच्छंद अर्थातच अनुक्रमे त्र्यंग व पंचांग प्रकारचा असतो. या प्रत्येक बाजूवर नक्षीदार उभा लतापट्ट असतो.

**९) वलभी प्रासाद :-**

याचा अधोच्छंद नेहमीच आयताकृती असतो. वरती छप्पर लांबट ढोलाकार असते. मद्रास जवळील महाबलिपुरम् येथील भीमाचा रथ या मंदिराच्या प्रकारचे उत्तम उदाहरण आहे. दुसरे उदाहरण ओरिसा राज्यातील

वेताळ देवालय हे आहे. या प्रासादांत कांही वेळेला मागचा भाग अर्धवर्तुळाकार असतो. पुढे आयताकाराचे दोन काटकोन व मागे अर्धवर्तुळाकार असा अधोच्छंद असतो. या आकाराला ध्वज म्हणतात. अर्धवर्तुळाकृती भागावरील शिखराचा आकार हत्तीच्या पाठीमागील भागासारखा (हस्तिपृष्ठाकृति) असतो. याचे उदाहरण पुन्हा मद्रास जवळील महाबलिपुरम् येथील सहदेव रथांत आढळते. तेर, जिल्हा उस्मानाबाद येथील त्रिविक्रमाच्या मंदिराचे शिखर याच प्रकारचे आहे मात्र अधोच्छंद आयताकार आहे, ध्वज पद्धतीचा नव्हे.

**१०) फांसनाकार प्रासाद :-**

या प्रकारच्या मंदिराचे शिखर पायऱ्या पायऱ्यांनी उंच गेलेले असते. कोणार्क येथील सूर्यमंदिराचा जो सभामंडप अस्तित्वात आहे त्याचे शिखर या प्रकारचे आहे.

**११) सिंहावलोकन प्रासाद :-**

अ) याला अनेक कूटच्छाद असतात. आ) वरती घंटाकृती शिखर असते; व इ) शिखरावरती सिंहकर्णांची नक्षी असते.

**१२) दारुज प्रासाद :-**

सिंहावलोकन प्रासादाप्रमाणे असतो परंतु संपूर्ण लाकडी असतो.

**१३) रथारूह प्रासाद :-**

रथाच्या चाकांवर असलेला नागर प्रासाद.

**१४) विमान-नागर-छन्द प्रासादः-**

अ) नागर प्रासादाप्रमाणे शिखर असते. आ) शिखराच्या प्रत्येक बाजूवर मध्यभागी लतेची नक्षी असते. शृंगे असतात. इ) लतिन प्रासाद व नागर प्रासाद यांच्या मिश्रणाने शिखर बनते.

**१५) विमान-पुष्पक :-**

नागर प्रासादाप्रमाणे असतो. शिखरावरील उरुशृंग फुलांच्या आकाराचे (?) असतात. शिवाय वरती घंटा असते. तिचा आकार मंदार पुष्पाप्रमाणे असतो.

प्रासादाचे वर्गीकरण करतांना त्याच्या शिखराची संकल्पना प्रामुख्याने विचारांत घेतलेली दिसते, व तसे अपराजितपृच्छा या शिल्पशास्त्रावरील ग्रंथांत स्पष्ट केलेलेही आहे.

वरील प्रासादांचे १५ प्रकार जर नागर, द्राविड व वेसर या तीनच वर्गीकरणांत बसवावयाचे असतील तर नागर प्रासादांच्या प्रकारांत नागरच्छंद, विमान, सांधार, लतिन, रथासह व विमान-नागर -छन्द हे प्रासाद येतात. द्राविड प्रकारांत फक्त द्राविड प्रासादच येतो. वेसर म्हणजे नागर व द्राविड या प्रासाद शैलींच्या मिश्रणाने होणाऱ्या प्रासादप्रकारांत मिश्रक, भूमिज, वराट, सिंहावलोकन व विमानपुष्पक प्रकारचे प्रासाद येतात. प्रासादाचे शिखर आकाराने नागर प्रकारचे, मात्र त्यावरती घंटा, हे वेसर प्रासादाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. वलभी व फांसनाकार हे प्रासाद प्रकार या तीनही प्रासादांमध्ये अंतर्भूत होत नाहीत. त्यांचे पुन्हा दोन निरनिराळे वर्ग करावे लागतात.

• • •


*With Best Compliments from*

**SUNISH CONSTRUCTION COMPANY**

'SUNITA NIWAS', KISAN NAGAR NO. 2,
ROAD NO.16, WAGLE ESTATE,
THANE 400 604.

**Bhai Sawant**
Tel.: 532 05 79

# भारत देशा जागा हो

प्रा. य. भ. भिडे

आम्ही राष्ट्र म्हणून स्वातंत्र्याचे पन्नासावे वर्ष साजरे करीत आहोत. आम्ही सामाजिक विकास बऱ्याच मोठ्या प्रमाणावर करण्यात यशस्वी व्हावे आणि आज पुढच्या शतकातील एक बलशाली राष्ट्र म्हणून जगातल्या लोकांनी आमच्याकडे पहावे हे आम्हाला खरोखरच कौतुकास्पद आहे.

असे असताना आम्ही अणुचाचण्या घेतल्या. त्या आमच्या राष्ट्राच्या संरक्षणासाठी गरजेच्या होत्या असे जवळ जवळ सर्वच पक्षांच्या पुढाऱ्यांचे मत आहे. त्यावर राष्ट्रामध्ये सर्वसाधारणपणे मतैक्य आहे. असे असताना जगातल्या काही राष्ट्रांनी आमच्यावर डोळे वटारून पहाणे, जणू काही कळतच नाही अशा अविर्भावात शहाणपण शिकवणे व तुम्ही असेच करावे आणि असे करू नये आणि त्यासाठी आम्ही तुमच्यावर आर्थिक निर्बंधांसारखी कारवाई करू असे दरडावणे, धमकावणे हे राष्ट्र म्हणून व ह्या राष्ट्राचे नागरिक म्हणून आम्हाला अपमानाचे आहे.

ही राष्ट्रे हे सर्व करू शकतात, करायला धजावतात ह्याचे कारण आम्ही आर्थिकदृष्ट्या त्यांच्यावर अवलंबून असणे, आमचे संरक्षण व अर्थकारण ह्यांमध्ये दुबळे असणे आणि आमचे अस्तित्व व विकास ह्यासाठी आम्ही त्यांच्याकडे अपेक्षेने पहाणे हेच आहे.

हा अपमान आम्ही सहन करणार आहोत का ? त्याची गरज आहे का ? असे डोळे वटारणे ज्या राष्ट्रांनी राष्ट्राभिमानाने धुडकावून लावले ती राष्ट्रे आज मोठी झाली आहेत की नाही ह्याचा आम्ही गांभीर्याने विचार करायला हवा. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनी आणि जपान मानहानी आणि कडक निर्बंध सोसूनही पुन्हा उभी राहून सामर्थ्यवान झालीच ना ? मग आम्हीच का ह्या काही सध्याच्या शक्तींचे प्रदर्शन करणाऱ्या राष्ट्रांनी डोळे वटारले तर त्यांची मनधरणी करायची ?

"आलात तर तुमच्यासह, न आलात तर तुमच्याशिवाय आणि मध्ये आलात तर तुम्हाला लोटून आम्ही एक समर्थ राष्ट्र म्हणून उभे राहू" असे आम्ही जगाला का ठणकावून सांगू नये ? आम्ही सध्या जो भेकडपणा दाखविण्याचा प्रयत्न करू इच्छीत आहोत तो राष्ट्राला मारक आहे असे म्हणावसे वाटते. येणाऱ्या अडचणींना सामोरे जावू , सगळे विरोध, मोडून काढू, अनंत हालअपेष्टा सहन करू परंतु आमचे मनुष्यबळ आमची साधनसंपत्ती आदी सर्व वापरून जगामध्ये मानाचे स्थान मिळवू. राष्ट्र म्हणून आमची असलेली सर्व उद्दिष्टे साध्य करू आणि कुणापुढेही मान तुकवणार नाही असे सगळ्यांना सांगणे आणि राष्ट्र म्हणून आपण सर्वांनी मान्य करणे आज आत्यंतिक गरजेचे आहे.

आम्ही हे करू शकतो असे विश्वासाने म्हणावेसे वाटते आणि म्हणूनच ह्या राष्ट्राला आणि आमच्या राष्ट्रप्रेमी नागरिकांना सांगावेसे वाटते- "हे राष्ट्रपुरुषा, हे भारतदेशा, जागा हो." "आणि जर तू आणि तुझे नागरिक असे जागे झाले, निर्धाराने राष्ट्रकार्यासाठी उभे राहिले तर भविष्यकाळ उज्ज्वल आणि मानाचा असेल, मानहानीचा नसेल ह्याच्यावर तू आणि तुझ्या नागरिकांनी विश्वास ठेवायला भरभक्कम जागा आहे, पाया आहे."

राष्ट्रीय संकटाच्या वेळी आम्ही असा पराक्रम, असे कर्तव्य करून दाखविलेले आहे. अलिकडच्या काळात, शिवाजीराजा आणि त्याच्या जनतेचा पराक्रम व कार्य, महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली आम्ही दिलेला स्वातंत्र्यासाठीचा लढा. पाकिस्तान व चीन ह्यांच्याबरोबरच्या युद्धात आम्ही दाखविलेले राष्ट्रीय ऐक्य, आणि केलेले राष्ट्रीय कार्य ही आमच्या संकटावर मात करण्याच्या राष्ट्रीय इच्छाशक्तीचे आणि सामर्थ्याचे द्योतक आहेत.

आजही अशाच इच्छाशक्तीची, अशाच राष्ट्रीय पराक्रमाची गरज आहे.

पक्षीय भेद, राजकीय व वैचारिक मतभेद विसरून आमच्या राष्ट्रीय पुढाऱ्यांनी देशाच्या कर्तृत्वशक्तीला आव्हान देणारे, जनसामान्याना सामावून घेणारे कार्यक्रम अथवा कामे लोकांपुढे मांडायला हवीत. उदा. डोंगराडोंगरावरून वाहून जाणारे पाणी अडवून गावागावातून जलसाठे निर्माण करणे व शेती, दुग्धव्यवसाय आदीसारखे व्यवसाय वाढवणे. ह्याला नाही परकीय मदतीची आवश्यकता किंवा नाही परकीय तंत्रज्ञानाची गरज.

शुमाकर (E.E. Shumacher) ह्या अर्थतज्ज्ञाने " Small is Beautiful" ह्या नावाचे पुस्तक लिहिले आहे. त्याचा सुमारे २०-२५ वर्षापूर्वी बराच गवगवा झाला होता. त्याने, गौतम बुद्धाने त्याच्या शिष्यांना दिलेला एक संदेश सांगून काही भाष्य केले आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे गौतमबुद्धाने त्याच्या शिष्यांना दर पाच वर्षांनी एक झाड लावून ते वाढवायला सांगितले आहे. झाडे मनुष्याला लागणारी औषधे, खायला फळे, फुले, भाजी, लिहायला कागद, ल्यायला वस्त्र असे सर्व काही देतात. झाड म्हणजे शुद्ध हवेचे कारखानेच आहेत. शिवाय जमिनीची धूप थांबवणे आणि भूगर्भामध्ये पाण्याचा साठा वाढविणे असे महत्त्वाच कार्यही ती करतात. शुमाकरच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही आत्ताच्या स्थितीमध्ये गौतम बुद्धाचा संदेश कार्यवाहीत आणला तर पुढल्या पंधरा वर्षात १०० ते ३०० कोटी झाडे लागतील. त्याचे मूल्य १५ वर्षांनी जर मोजले तर आजपर्यंतच्या पंचवार्षिक योजनांमध्ये झाली नाही इतकी राष्ट्रीय संपत्ती आम्ही निर्माण करू शकू. आणि ह्याला पुन्हा ना दुसऱ्या राष्ट्राकडून आर्थिक मदतीची वा आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञानाची गरज.

शुमाकरनेच जगाला मोठाले कारखाने, मोठाली धरणे आणि खर्चीक, भांडवलाच्या दृष्टीने राष्ट्रांना न परवडणारी आजची उत्पादनप्रक्रिया ह्यांपासून दूर रहायला सांगितले आहे. डॉ. राम मनोहर लोहिया, महात्मा गांधी ह्यांच्याप्रमाणेच Intermediate Technology या Appropriate Technoology (सुयोग्य तंत्रज्ञान) विकसित करायला भारतासारख्या देशांना सुचविले आहे. भारतीय बेरोजगारीचा प्रश्न आजच्या अवाढव्य भांडवल लागणाऱ्या तंत्रज्ञानाने कदाचित केव्हाही सुटू शकणार नाही आणि आम्ही मात्र विकास भांडवलाशिवाय शक्य नाही असं म्हणून ह्या भांडवलासाठी जगापुढे हात पसरत राहू आणि राष्ट्रीय अस्मिता गमावून बसू.

जलसंधारण, वृक्षलागवड ह्या सारख्या कार्यक्रमाबरोबरच तरुणांना व जनसामान्यांना सामावून घेता येईल असे अनेक राष्ट्रीय कार्यक्रम लोकांपुढे ठेवता येतील- ग्रामीण आरोग्य, निरक्षरता, मानवी आणि पशुसंपत्तीचा विकास, ऊर्जा उत्पादनाचे निरनिराळे मार्ग (उदा. श्री क्रांतीभाई श्रॉफ ह्यांनी बैलांच्या सहाय्याने वीज उत्पादनाचा प्रयोग चालविला आहे त्याचा अधिक अभ्यास करून विकास करता येईल का किंवा सौर ऊर्जा अधिक चांगल्याप्रकारे वापरता येईल कां हे पहाणे), देशाच्या सर्व प्रमुख नद्या जोडून दुष्काळ आणि पूर ह्यांचे दुष्टचक्र थांबवणे किंवा सह्याद्री, हिमालय ह्यांसारखे डोंगर आणि गंगा, यमुना सारख्या नद्या वाचवणे, व्याधीवरील आमच्या मातीत वाढलेल्या उपचार पद्धती उदा. आयुर्वेद आणि युनानी आणि योगासारख्या जीवन समृद्ध करणाऱ्या आयुरारोग्य देणाऱ्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करणे असे अनेक कार्यक्रम राष्ट्रीय नेत्यांनी राष्ट्रीय पुनरुत्थानाचा भाग म्हणून लोकांपुढे मांडले पाहिजेत.

ह्या सगळ्याला किती परकीय भांडवल किंवा तंत्रज्ञान लागेल ह्याचा प्रत्येकाने विचार करावा.

ह्या राष्ट्राची बलस्थाने व त्याची कमकुवत अंगे कोणती आहेत त्याचा राष्ट्रीय नेत्यांनी व नागरिकांनी गांभीर्याने अभ्यास करावा व देशासाठी, देशातील तरुणांसाठी आणि जनसामान्यांसाठी राष्ट्रीय कार्यक्रम आखावे व त्यांमध्ये जास्तीत जास्त लोकांना समावून घ्यावे.

ढोबळ मानाने भारताची मोठी लोकसंख्या , पशुधन, नैसर्गिक वैविध्य व साधनसंपत्ती, भरपूर पडणारा

पाऊस, व पाण्याचा साठा केल्यास जवळ असणारा भरपूर जलसाठा की ज्यामुळे ह्या देशात कुठेही कधीही दुष्काळ नसेल. ह्या देशाच्या तीन बाजूनी असणारा समुद्रकिनारा की ज्यामधून भरपूर सागरी संपत्ती, खाद्य वस्तू, तसेच सुयोग्य तंत्रज्ञान विकसित केल्यास मोठ्या प्रमाणात मिळू शकणारे गोडे पाणी, चांगल्या प्रकारे विकसित झालेले तंत्रज्ञान व तंत्रज्ञांचा मोठा ताफा, सुस्थापित लोकशाही आणि स्वयंसेवी संस्थांचे जाळ व त्यांनी देशभर चालविलेले निरनिराळे प्रयोग अशी बलस्थाने म्हणून सांगता येतील.

ह्या देशाची अफाट लोकसंख्या व तिची मध्या होणारी व संभाव्य वाढ हे एक संकट आहे आणि ती मर्यादित ठेवायला हवी. परंतु आहे ही लोकसंख्या व पुढील पंचवीस वर्षांपर्यंतची येणारी जनसंख्या ही ओझं न होता साधनसंपत्ती ठरेल असे आर्थिक व सामाजिक नियोजन करणे गरजेचे आहे. जागतिक स्थरावर मनुष्यबळ विकास (Human Development Index) पाहता आम्ही पार तळाला आहोत. हे आमच्या मर्यादित आर्थिक व सामाजिक विकासाचे मोठे कारण आहे कां ? भांडवलाधारित आर्थिक विकास, भारी यंत्रोद्योगाधारित विकास (Heavy Industries Model of Economic Development) उपभोग्य वस्तूंवर आधारित आर्थिक विकास (Consumer Goods Model) असे निरनिराळे आर्थिक विकासाचे प्रयोग जगभर झाले आहेत. आम्ही मनुष्यबळावर आधारित आर्थिक विकासाचे (Human Resource Development as a stratgic option of Economic Development) नवे गणित मांडून आमच्या पशुधनाचा व नैसर्गिक साधनसंपत्तीचा संपूर्ण वापर करून आर्थिक विकास घडवू शकतो कां ह्याचा विचार राष्ट्रीय नेत्यांनी , विचारवंतानी व राष्ट्रीय नियोजनकारांनी करावा.

जगभरच्या औद्योगिक संस्था (Corporates) असे मनुष्यबळ विकासाचे साधन वापरून त्या कंपन्यांचा विकास, आर्थिक स्थिती, नफ्यातील वाढ आणि एकूणच आंतरराष्ट्रीय व्यापारी स्पर्धेला सामोरे जाण्याची क्षमता वाढवीत आहेत. ज्या कंपन्या मनुष्यबळविकासाकडे व त्याच्या पूर्ण वापराकडे दुर्लक्ष करतात त्यांचा विकास मंदावतो व आर्थिक स्थिती दोलायमान होते असे दिसते. तसेच देशाच्या मनुष्यबळासंबंधी म्हणता येईल.

आम्ही मनुष्यबळविकासाच्या क्षेत्रातील तज्ज्ञांना विचारले तर ते आणखी मोठा धक्का आपल्याला देण्याची शक्यता आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सर्वसामान्य माणस आपल्या क्षमतेचा (Potential) फारच थोडा भाग त्यांच्या आयुष्यभरात वापरतात. त्या क्षमतेचा पूर्ण वापर होण्यासाठी सुयोग्य परिस्थिती, आव्हाने व मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाचा पूर्ण विकास होण्याची गरज आहे असं ते आग्रहाने सांगतील.

तात्पर्याने असे म्हणता येईल की भांडवल, नैसर्गिक साधनसंपत्ती, यंत्रे ह्यांना जे शक्य नाही ते माणूस करून दाखवू शकेल. मग अशा अफाट मनुष्यशक्तीचा पूर्ण वापर करून देशाचा कायापालट करता येणे शक्य आहे ना ?

अर्थातच ह्या मनुष्यबळ विकसित करण्यासाठी व त्याचा सुयोग्य, पूर्ण वापर होण्यासाठी सक्षम, उत्तुंग, लोकमान्य अशा नेतृत्वाची गरज आहे आणि समाजातील सर्व थरातील लहानमोठ्या नेत्यांनी ह्या संबंधात जाणीवपूर्वक प्रयत्न करायला हवेत. आम्ही पालक असू, शिक्षक असू, व्यावसायिक असू, आम्हाला आमच्या मर्यादित क्षेत्रात हे मनुष्यबळविकास आणि राष्ट्र विकासाचे कार्य करता येणे शक्य आहे.

आज गरज आहे देशाला दिशा देण्याची, त्याचे स्वत्व जागे करण्याची. जे महात्मा गांधींनी केले, लोकमान्यांनी केले किंवा शिवरायांनी केले. आमच्या राष्ट्रीय नेत्यांनी अशी दिशा देशाला द्यावी, एक भव्य दिव्य, आव्हानात्मक राष्ट्रीय कार्यक्रम देशाला द्यावा आणि त्यामध्ये सर्वांनी स्वतःला झोकून द्यावे.

राष्ट्रीय नेतृत्वाने सर्वांना त्यामध्ये सामावून घ्यावे, आणि त्याला आम्ही सर्वांनी व छोट्यामोठ्या नेत्यांनी पूर्ण वाहून घ्यावे, हे गरजेचे आहे. सर्वच्या सर्व राष्ट्र कामाला लागले तर ह्या देशाला काहीही अशक्य नाही. शून्यातून विश्व निर्माण करता येते, वाळवंटातून इस्रायल सारखे सामर्थ्यशाली राष्ट्र निर्माण होते तर विपुल

साधनसंपत्तीअसलेला हा देश मागासलेला, दुसऱ्यावर अवलंबून, दुसऱ्यांनी केलेली मानहानी सहन करणारा का रहावा ?

आमचे राष्ट्रपती, पंतप्रधान यांना किंवा इतर जनतेला किंवा बहुतांश भारतीयांना मान्य होणाऱ्या नेतृत्वाने राष्ट्रीय अस्मिता जागी करावी, राष्ट्राच्या स्वत्वाचा, तेजाचा स्फुल्लिंग जागा करावा असे आग्रहाने सांगावेसे वाटते.

आणि अशा प्रकारच्या नेतृत्वाने हाकारल्यावर पक्षीय मतभेद विसरून असा राष्ट्रीय कार्यक्रम राबविण्यासाठी, यशस्वी करण्यासाठी आम्ही सर्वांनी कामाला लागले पाहिजे. मग राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्वहिंदुपरिषद, शिवसेना, बजरंगदल, कम्युनिस्ट पक्ष, काँग्रेस पक्ष, समाजवादी पक्ष अशा कार्यकर्त्यांनी भरपूर ताफा असलेल्या संस्था व त्यांचे संस्थाप्रमुख ह्यांनी त्यात प्रामुख्याने भाग घ्यावयास हवा. परंतु पांडुरंगशास्त्री आठवले ह्यांच्यासारखे भरपूर अनुयायी (त्यांच्या अनुयायांनी इतर अनेक चांगल्या उपक्रमांबरोबरच श्रमदानाने जलसाठे तयार करायला सुरुवात केली आहे.) असलेले समाजाचे नेते, धार्मिक नेते, शाळा व महाविद्यालयातील शिक्षक, सरकारी अधिकारी आणि अगदी गणेशोत्सव मंडळ, शिवजयंती मंडळ चालविणारे कार्यकर्ते ह्या सर्वांनी हा जगन्नाथाचा रथ वाहायचा, पुढे न्यायचा प्रयत्न केला पाहिजे. असे झाले तर सगळ्या जगाने धमकावणे, आमच्याकडे दुर्लक्ष केले किंवा जागतिकीकरणाच्या रेट्याखाली आम्हाला ठेचून काढायचा, नष्ट करायचा प्रयत्न केला तरी ते त्यांना शक्य होणार नाही. जगाने आम्हाला जिंकायच्या ऐवजी आम्हीच जग जिंकू.

शेवटी कवी माधव ज्युलियन ह्यांनी म्हटल्याप्रमाणे आमच्या देशबांधवाना आणि त्यांच्या नेत्यांना विचारावेसे वाटते--

''हिंदपुत्रानो, स्वतःला लेखिता का बापडे ?

भ्रांत तुम्हां कां पडे ?

वाघिणीचे दूध प्याला वाघबच्चे फाकडे,

भ्रांत तुम्हां कां पडे ?''

आणि पुन्हा त्यांच्याच शब्दात सांगावेसे वाटते --

'' कायदा पाळा गतीचा, काळ मागे लागला,

थांबला तो संपला

धावत्याला शक्ति येई

आणि रस्ता सापडे.''

किंवा समर्थ रामदासांच्या शब्दांचे स्मरण करून द्यावेसे वाटते--

'' वन्ही तो चेतवावा रे चेतविताची चेततो,

केल्याने होत आहे रे आधी केलेच पाहिजे.''

आज गरज आहे अशा राष्ट्रीय शक्तीला जागे करण्याची, तिला चालना देण्याची.

आमचे नेते आणि आम्ही सर्व असे आमचे स्वत्व जागे करण्याचे काम आत्मविश्वासाने हातात घेऊ या आणि स्वातंत्र्याची पुढील पन्नास वर्षे चांगल्या अर्थाने संस्मरणीय करू या. तरच माधव ज्युलियन, रामदास स्वामी, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी आदींना दिलेला संदेश सार्थकी लागेल.

• • •


With Best Compliments From

Bhushan S. Sawant
Resi. : 5325321/5325022

**Sai Vijay Transport**
Fleet Owners & Transport Contractor

**SHREE SAI AGENCY**
Storing, Clearing & Forwarding Agent
Godown, No.3, Vimal Compound,
Opp. Purna Bus Stop,
PURNA Village, Bhiwandi T.K.
Thane Dist.
Tel. Off. : 31458, C/o. 20712.

# सन २०४७ ची भारताची बखर

श्री. विश्वनाथ शेंडे

बखर वाङ्मय हा मराठीतील एक प्राचीन गद्य वाङ्मय प्रकार. शालिवाहनाची बखर ही सर्वात प्राचीन बखर समजली जाते. बखर हा शब्द 'खबर' वृत्त, बातमी, माहिती अशा अर्थाच द्योतक आहे. वृत्त अगर इतिहास होण्यास जे योग्य ते बखरीत सापडेल. इतिहासाच्या विद्यार्थ्यांना बखरींचा आश्रय घेतल्याखेरीज एक पाऊलही पुढे जाणे शक्य नाही. या बखरींतून तत्कालीन चरित्रे, राजकीय स्थिती, सामाजिक चालीरीती, आर्थिक जडणघडण व सांस्कृतिक स्थिती तसेच स्थळ वर्णने इ. गोष्टींची माहिती होते.

पेशव्यांची बखर, नागपूरकर भोसल्यांची बखर, पानिपतची बखर, होळकरांची कैफियत आदी अनेक बखरी इतिहासाच्या विद्यार्थ्यांना ओळखीच्या आहेत व इतिहासाचे अभ्यासक त्यांचा अभ्यास करीत असतात.

**कल्पना करा**

अशीच एक बखर एखादा इतिहासतज्ज्ञाला सन २०९७ साली उपलब्ध झाली तर तीमध्ये काय असेल? १९४७ ते २०४७ पर्यंतच्या भारताच्या एकूण तत्कालीन परिस्थितीची माहिती देलेली असण्याची शक्यता आहे. इतिहासाच्या वाचकापर्यंत ती पोचावी म्हणून या काल्पनिक बखरीतील गोषवारा थोडक्यात देत आहे. या बखरीचे शीर्षक आहे 'सन २०४७ ची भारताची बखर'.

**सन २०४७ ची भारताची बखर**

भारत किंवा हिंदुस्थान हा फार प्राचीन काळी खंडप्राय देश होता. येथील लोक अतिशय कष्टाळू, प्रामाणिक आणि गरिबीतहि आनंद मानणारे होते. या देशावर एक काळ वैदिक संस्कृती नांदली. पुढे शक हूणांच्या स्वाऱ्या झाल्या. गुप्त, मौर्य, यादव इत्यादी राजघराणी झाली व विलयाला गेली.

येशू ख्रिस्ताने ख्रिस्ती धर्म स्थापन केला व त्याचा जगभर प्रसार झाला. कधी प्रेमाने तर कधी बळजबरीने हा धर्म भारतातही वाढला. महंमद पैगंबराने इस्लाम धर्म स्थापन केला व त्यांच्या अनुयायांनी याही धर्माचा जगभर प्रसार केला. सांप्रत या जगातील बहुंशी प्रजा या तीन धर्मात वाटली गेली आहे. त्यांचे जेव्हा परस्पर झगडे होतात तेव्हा त्यांना भारतात दोन धर्मातील युद्ध न मानता दोन गटांतील मारामाऱ्या असे म्हटले जाते. कारण त्यामुळे परस्परात वैरभाव राहत नाही असा येथे समज आहे.

भारतातही सन १२०० नंतर मुस्लिम व ख्रिस्ती धर्मअनुयायांनी परदेशातूनच राज्यकारभार पाहिला. सन १२०० ते १७५७ पर्यंत मुसलमान राज्यकर्त्यांनी भारतातील राज्यकर्त्यांशी लढण्यात वेळ घालवला. या लढायांतील हत्यारांच्या वापरामुळे अनेक देवळे उद्ध्वस्त झाली. अनेक वास्तू नष्ट झाल्या. अनेक शिल्पे, मूर्ती विद्रूप दिसू लागली. लक्षावधी स्त्रिया सन्मानाने मुसलमान बनवण्यात आल्या. अनेक हिंदूंनी मुसलमान धर्माचा प्रेमाने स्वीकार केला. सारं कसं हिंदू-मुस्लिम सौहार्दाने घडत गेल.

ब्रिटिश राज्यकर्त्यांनी हा खंडप्राय देश पुन्हा अखंड केला व अखंड हिंदुस्थानवर १५० वर्षे राज्य केले. ज्या देशात पूर्वी सोन्याचा धूर निघत होता येथे आता कोळशाचा धूर ओकणारी धुरांडी निर्माण झाली आहेत. या देशातील राजे-रजवाडे या संस्था कायम ठेवून प्रजेला राजांचे गुलाम केले व येथील राजांना आपले मांडलीक करून त्यांना आपले दास्यत्व पत्करावयास लावले. आजही येथील प्रजा गुलामच आहे.

मेकॉले नावाच्या एका ब्रिटीश पंडीताने या देशासाठी शिक्षणनीती आखली व या देशावर बौद्धिक गुलामगिरी लादली. भारताची प्रजा गुलामी मनोवृत्तीची बनावी यासाठी शालेय अभ्यासक्रम बनविले व गुलामांची फौज बनविण्याचे कारखाने काढले.

या देशातील संत राजकारण्यांनी ब्रिटीश सत्तेला, रक्ताचा थेंब न सांडता अहिंसक मार्गाने देशाबाहेर घालविले. १४ ऑगस्ट १९४७ रोजी रात्री १२ वा. अमावस्येच्या शुभ मुहूर्तावर भारताची खंड खंड फाळणी करण्यात आली.

२६ जानेवारी १९५० रोजी ब्रिटीश पद्धतीवरच लोकशाही पत्करण्याचे भारताने ठरविले. राष्ट्रपती, पंतप्रधान हे केंद्रस्थानी बलवान ग्रह आहेत तर मुख्यमंत्री, महापौर, ग्रामसभापती हे उपग्रह मानण्यांत आले.

भारतात अनेक भाषा आहेत. त्यामुळे कोणालाच कोणाची भाषा धड येत नाही. व समजतही नाही. येथील राजकारण्यांची भाषा राजकारण्यांना व विद्वान पत्रकारांना कळते. येथील प्रजा आपल्या अकलेप्रमाणे कुवतीप्रमाणे या भाषांतून आपल्याला सोयीचा अर्थ काढते व स्वार्थ साधण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे येथे भाषावार राज्ये निर्माण करण्यात आली. यामुळे इंग्लिश या परदेशी भाषेचे महत्त्व वाढले. भारतातील विद्वान लोक जगमान्यतेसाठी इंग्रजीतून लिखाण करतात. यामुळे भारतातील सामान्य अडाणी समाज विद्वानांपासून दूर राहिला आहे.

पंतप्रधानपद हे निरंकुश व सर्वेसर्वा झाल्यावर येथील राजांची संस्थाने व त्यांचे तनखे मोडीत निघाले. लोकशाहीतील मातब्बर सरदारांनी 'खंडणी' या नावाने तनखे घेणे सुरू केले ते कायम आहेत. जुन्या राजकारण्यांचा मागमूस राहिलेला नाही. काही माजी मातब्बर राजघराणी अजूनही तग धरुन आहेत. सन १९६४ नंतर दिल्लीतील केन्द्र सत्ता उत्तरोत्तर दुबळी होत गेली. राष्ट्रपती हे पंतप्रधानांच्या आज्ञेनुसार वागतील अशी घटनेतच तरतूद केल्यामुळे राष्ट्रपतिपद रबर स्टॅम्प होऊ लागले. भारतात येणाऱ्या देशीविदेशी थोर पाहुण्यांना खाना देणे, १५ ऑगस्ट, २६ जानेवारी आदी स्वातंत्र्यतिथींना दिल्लीच्या लालकिल्ल्यावरुन बुलेट प्रुफ खोक्यातून राष्ट्राला निर्भयता, स्वातंत्र्य, समता, दलितोद्धार, गरिबी निर्मूलन आदी समस्यांवर काम करण्याचे जनतेला आवाहन करणे व त्यानंतर राष्ट्राच्या सैनिक संचलनाचे दर्शन इ. कामे राष्ट्रपती निष्ठेने पार पाडतात. सततच्या शपथविधींनी राष्ट्रपती हैराण झाले आहेत. दीन, दुबळे, म्हातारे राष्ट्रपती हे राष्ट्रीय वैशिष्ट्य आहे. भारताला तरुण राष्ट्रपतींची परंपरा नाही. राजकारण्यांवर पतीचा हक्क एखादा राष्ट्रपती सांगू लागला तर अनास्था प्रसंग निर्माण होईल म्हणून राजकारण्यांनी सावधपणे पावलेले टाकलेली आहेत.

राज्यांच्या बारभाई कारस्थानांनी दिल्लीची सत्ता पोखरून काढली आहे. षंढ व नामर्द राजे दिल्लीच्या तक्तावर बसवायचे व त्यांच्या नावाने सरदारांनी राज्याराज्यात हैदोस घालायचा व जनतेची नानाविध मार्गांनी लूटमार करावयाची हे जुनेच तंत्र नव्याने राबविण्यात येत आहे.

येथील जनता ही सहनशील, काम न करता दाम व गुलामी मनोवृत्तीची वाटते. बंडखोर वृत्तीच्या व उपद्रवी विद्वानांना सरकारात महामंडळांवर स्थान देण्यात येते. लाल दिव्याची गाडी, रहायला अलिशान बंगला, विक्रीसाठी राजप्रासादतुल्य फ्लॅटस् इ. अल्प सुविधा महामंडळांच्या अध्यक्षांना देण्यात येतात. सरकारी तिजोरी लुटण्याची सवलत यांना देण्यात येते व यांचे बंडखोरपण सौम्य करण्यात येते.

येथे पत्रकार नावाची स्वतंत्र जमातच आहे. यांना सरकारी कॉलनीत घरे दिली जातात व त्यांच्या निवासाचा प्रश्न सोडविलेला आहे. वृत्तपत्र स्वातंत्र हा परवलीचा शब्द आहे.परंतु येथील तथाकथित पत्रकार मोठमोठ्या शेठजींचे नोकरदार अथवा राजकारण्यांचे भाट आहेत. वृत्त खरेच असले पाहिजे हे त्यांच्यावर बंधन नाही. वृत्तपत्रस्वातंत्र्य हे मालकांच्या मर्जीवर कमी जास्त प्रमाणात सांभाळले जाते. भारतातील सारेच पत्रकार विद्वान, निर्भीड आहेत व राजकारण्यांशी व अर्थकारण्यांशी संबंधित आहेत. सिनेमातील अधिवृत्त नटनट्यांवर चविष्टपणे लिहिणे, गुन्हेगारीवर सनसनाटी लिहिणे इ. जनहिताचे लिखाण या वृत्तपत्रातून असते. लोककल्याणकारी योजनांना, समाजसेवकांना क्वचित प्रसिद्धी दिली जाते.

या देशातील नागरी जीवनावर आयुक्त, उपायुक्त, महापौर, नगरसेवक आदी नगरभक्षकांचा ताबा आहे.

जनतेच्या शिक्षणासाठी, मनोरंजनासाठी एक इंचही जागा ठेवायची नाही अशी त्यांनी शपथच घेतली आहे असे वाटते. शहरे व खेडी ही दिवसेंदिवस भकास होत चालली आहेत. नगरभक्षकांच्या करोडो रुपयांच्या मालमत्ता असून या मालमत्ता लपविण्यासाठी सल्लागारांची फौज दिमतीला असते.

सर्व सरकारी खाती व सरकारी नोकरशाही जनतेकडून कररूपाने, नवीन नवीन मार्गांनी कसा पैसा मिळवावा, यात गुंतलेली आहेत. सतत सत्ताबदल व प्रशासकांच्या अकार्यक्षमतेमध्ये यांच्यावर कोणाचा अंकुश नाही. त्यामुळे जनता सतत त्रस्त राहते व कोणत्याहि क्षुल्लक कारणांनी 'हिंसक बंद' करून बळी पडते. खेड्यांतले राजकारण चारा घोटाळे, खत घोटाळे, रस्ते घोटाळे, दिवाबत्ती घोटाळे इ. घोटाळ्यांनी संपन्न आहे. आर्थिक क्षेत्रात बँका, शेअरमार्केट, आर्थिक संस्थांवर सटोड्यांचा, सट्टेबाजांचा ताबा आहे. मटक्याचा धंदा मोडीत निघाला असून आता राज्यसरकारेच लॉटऱ्या अधिक चालवतात. एक आकडी लॉटरी अधिक लोकप्रिय आहे. दारू, नशेची साधने आता सरकारी दुकानांतून उपलब्ध होतात.

टी.व्ही. कॉम्प्यूटरसारखी प्रचार माध्यमे भारतात पाश्चात्य संस्कृतीचा प्रसार करीत आहेत. मधून मधून आध्यात्मिक गुरुंची भाषणे ठेवली जातात. भारतीय संस्कृतीची एक जपणूक. अर्धनग्न, बेंब्या उघड्या टाकलेल्या नट्या, कामक्रीडेचे बीभत्स हावभाव, कानठळ्या बसविणारे संगीत, फालतू हास्यमालिका हे या टी.व्ही. कार्यक्रमांचे वैशिष्ट्य आहे. बियरबार, परमिट रुम इ. संस्था जोर धरू लागल्या आहेत.

कपड्यांकडून नग्नतेकडे समाज झुकू लागला आहे. याविरुद्ध बोलणाऱ्यांची संस्कृतिरक्षक, बूर्झ्वा, जुनाट वृत्तीची खडूस आदी शेलक्या विशेषणांनी संभावना केली जाते.

भारतातील राज्यांचा कारभार हा संशोधनाचा विषय आहे. सर्वत्र बजबजपुरी ह्या एका शब्दात वर्णन करणे शक्य आहे. राजकारणात पक्ष पद्धती जाऊन टोळ्यांचे राज्य सुरु झाले आहे. सरकारी दहशतवाद हा न पेलणारा जनतेवरचा बोजा आहे. नोकरशाही, सरकारी मालमत्ता आपुलकीच्या भावनेने आपली मालमत्ता समजून वापरते. घराणेशाही हे येथील राजकीय व सामाजिक वैशिष्ट्य आहे. राज्यकर्त्यांत पिढ्या न पिढ्या राज्यकर्ते होतात तसे नोकरांतही पिढ्या न् पिढ्या सरकारी नोकरीच करण्याचा पाणा दिसतो. १९४७ साली सुरु झालेले अनेक प्रकल्प अजूनही २००० सालात प्रलंबित अवस्थेत आहेत. स्त्रियांना सर्वच क्षेत्रात आरक्षण देण्यात आले आहे. त्यामुळे स्त्री-पुरुष संबंध संघर्षाप्रत पोचले आहेत.

उत्तरेकडील राज्ये यादवांनी काबीज केली आहेत तर दक्षिणेकडे नटनट्या व त्यांच्या वंशजांकडे राज्यकारभार चालत आला आहे.

भारताच्या सांस्कृतिक क्षेत्रावर गेली १०० वर्षे परकीय आक्रमण चालू आहे. नीतीमत्ता, मूल्ये इ. शब्द शब्दकोशातून काढलेले आहेत. त्याबदली भ्रष्टाचार, व्यभिचार, खून, दरोडे, खंडणी, बलात्कार आदी शब्दांना' नवीन प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे.

कुटुंबसंस्था नष्ट झाल्याने संस्कार इ. शब्द नष्टप्राय झाले आहेत. स्त्रीपुरुषभेद हा निसर्गनियमांपुरताच मर्यादित आहे. अमर्याद व्यक्तिस्वातंत्र्य, स्वैराचार, अविवाहित जोडपी, अनैसर्गिक विवाह, मातापित्यांशिवाय संतती इ. गोष्टी सुसंस्कृतपणात गणल्या जातात.

लोक नित्य प्रवास करतात. पर्यटन विभागाकडून ऐषाराम स्थळांची निर्मिती करण्यात आली आहे. जुन्या भव्य देवळांजवळ, राजवाड्यांजवळ मदिरा व मदिराक्षींचा प्रसाद मुक्तपणे उपलब्ध असतो.

शिक्षणातून अभ्यास व परीक्षा हे विषय वगळण्यात आले आहेत. प्रजाजनांच्या वयाच्या १९व्या वर्षी सरकारतर्फे पदवीदान केले जाते. व संबंधित तरुण अगर तरुणी ही उत्पादनक्षम झाल्याचे प्रमाणपत्र देण्यांत येते. यामुळे खोट्या पदव्या विकणाऱ्यांचे प्रमाण कमी झाले आहे. तरी सुद्धा वयाचे खोटे प्रमाणपत्र देणारे वाढले आहेत.

(पान क्र. २२ वर)

# इतिहासाच्या दर्शनाने पुनीत झालेले क्षण-

कु. आरती बाकळे

महाविद्यालयीन दिवसांत बहुसंख्य विद्यार्थी कॉलेज-कट्टा किंवा कॅण्टीन याखेरीज फारसे कुठे फिरकत देखील नाहीत. एवढेच काय पण महाविद्यालयात घडणाऱ्या अनेक गोष्टींचा त्यांना पत्ता सुद्धा नसतो. ह्या गार हिरवळीच्या दिवसांत पावसाचे मोहरून टाकणारे थेंब आम्ही अंगावर मुळी घेतच नाही. आणि नंतर मात्र पश्चाताप करण्याची वेळ येते. पण निसटून गेलेले क्षण पुन्हा हाती येणं शक्य नसते. आणि मग राहते केवळ रुखरुखी.. अशीच शिक्षकांच्या संपाच्या काळात नकळत माझी पावले 'थोरले बाजीराव पेशवे सभागृहा' कडे वळली. सभागृहातून 'ऐ मेरे वतन के लोगो...' चे संथ सूर मनाची तार अलगद छेडू लागले. या सुरांची, शब्दांची मोहिनी जणू काही आम्हाला सभागृहाकडे खेचत होती. प्रवेशद्वाराच्या वर नजर टाकली तेव्हा-'भारतीय इतिहासाची साधनसामुग्री - ग्रंथ प्रदर्शन' असा बोर्ड टांगलेला दिसला. सहज कुतूहल म्हणून हे प्रदर्शन पहायला आम्ही गेलो आणि अक्षरशः मोत्यांसारखे मौलिक क्षण हातात घेऊन परतलो.

अनेक प्रश्न, समस्या यांचा विषय बनलेली आजची युवापिढी, धावत्या जगाच्या तालावर धावणारी, स्वतःला हरवून बसणारी आणि हरवून पुन्हा गवसणारी आजची युवापिढी. नव्याच्या शोधात असणारी आजची तरुण पिढी भारतीय इतिहासाविषयी बरीचशी अनभिज्ञ आणि काहीशी अनुत्सुक भासते. तसे पाहता त्यांना आपल्या इतिहासाविषयी आदर आहे. पण ह्या ऐतिहासिक ज्ञानार्जनासाठी महत्वाचे असणारे परिश्रम त्यांना नको असतात. इतिहास जाणून घेण्यासाठी सखोल ज्ञानाची आवश्यकता असते. परंतु दोनचार चणे तोंडात टाकल्याप्रमाणे 'चारोळी' काव्य ऐकणारी आजची युवापिढी परिश्रमांच्या बाबतीत मागे पडते आहे. त्यामुळे अतिशय महत्वाचे व अल्पुपयोगी ग्रंथ त्यांच्या हाती पडत नाहीत. आणि मग पाण्याच्या बुडबुड्यांसारखे ज्ञान मिळवून आम्ही समाधान पावतो.

पण या काही आजच्या युवापिढीच्या मर्यादा नव्हेत. त्यांच्यापर्यंत सखोल ज्ञान पोहचविण्यास बऱ्याच अंशी आधारभूत घटक जबाबदार असतात. ते आधारभूत घटक म्हणजे शिक्षणसंस्था, शिक्षणमंडळ, शिक्षक, ग्रंथालये इ. आजच्या युवापिढीला त्यांच्याकडून जास्तीत जास्त प्रोत्साहन मिळण्याची गरज आहे. अन्यथा त्यांच्यापासून विविध क्षेत्रातील ज्ञान, विशेषतः ऐतिहासिक ज्ञान दुरावत जाईल. व पुराभिलेख, ऐतिहासिक ग्रंथ हे केवळ कपाटातील दुर्लक्षित व स्पर्श न केलेले कागद ठरतील.

खरे तर पुराभिलेख, ऐतिहासिक अभिलेख, ग्रंथ ह्यांची तोंडओळख झालीच पाहिजे. ह्या सर्वांचे महत्व हे अनन्यसाधारण असे आहे. इतिहासावर प्रकाश टाकणारा तो महत्त्वाचा स्रोत आहे. म्हणून अशा अभिलेखांची, ग्रंथांची प्रदर्शने भरवणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांचे जतन करणे जेवढे महत्वाचे आहे, तेवढेच त्यातील ज्ञान इतिहास जाणण्यास उत्सुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीला मिळणे गरजेचे आहे. ही गरज ११ व १२ऑगस्ट रोजी बाजीराव पेशवे सभागृहात अंशतः का होईना पण पूर्ण झाली.

सभागृहात प्रवेश केल्यावर प्रदर्शनाच्या सुरवातीलाच महाराष्ट्राची अस्मिता आणि मराठबाणा जपणाऱ्या शिवप्रभूंच्या भव्य अर्धपुतळ्याच्या दर्शनाने आमचा इतिहासकालात नकळतच प्रवेश झाला. कालक्रमानुसार ग्रंथ, पुराभिलेख यांची मांडणी केलेली होती. या ग्रंथांत व अभिलेखात भारतीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या इतिहासाचे मूलभूत आधारसाहित्य, आंदोलनासंबंधीचे लेख मांडले गेलेले होते. त्याचप्रमाणे १८५७ चे स्वातंत्र्यसमर, वासुदेव बळवंत फडके यांचा उठाव, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वातंत्र्यवीर

सावरकर इत्यादी नेत्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी केलेले कार्य तसेच १९४२ ची चलेजाव चळवळ या सर्व घटनांचे संदर्भ देणारी कागदपत्रे प्रदर्शनात मांडण्यात आलेली होती. स्वातंत्र्यकालीन अनेक राजकीय नेत्यांची छायाचित्रेही लावण्यात आलेली होती. हे प्रदर्शन पाहताना भारतीय इतिहासच डोळ्यासमोरुन सरकत होता. 'क्या लोग थे वो दीवाने.. क्या लोग थे वो अभिमानी' च्या तालावर टिळक, गांधी, सावरकर, नेहरू यांची छायाचित्रे पाहताना डोळ्यांच्या कडा नकळत ओलावत होत्या. हृदय पुरते त्या इतिहासात गुंफले जात होते. सहज म्हणून बघायला गेलेल्या या चिमुकल्या प्रदर्शनाने कितीतरी वेळ आम्हाला गुंतवुन ठेवले.

जे पुराभिलेख सर्वसामान्यांना सहज उपलब्ध होणार नाहीत, ते या प्रदर्शनातून उपलब्ध केले गेले. त्याचप्रमाणे गृहविभाग, पोलिस संचालनालय कार्यालयातील गोपनीय दस्तऐवज, ठाणे जिल्ह्यातील स्वातंत्र्यचळवळींचा संक्षिप्त आढावा या प्रदर्शनाद्वारे घेण्यात आला होता. महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेख विभागाच्या वतीने अभिलेखांचे जतन करून निगा राखली जाते. अशा अभिलेखांची माहिती जनतेला व्हावी या उद्देशाने ह्या प्रदर्शनाचे आयोजन केले गेले होते.

असे स्तुत्य उपक्रम नागरिकांसाठी, मुख्यतः विद्यार्थ्यांसाठी आयोजिले जाणे आवश्यक आहे. कारण अशा उपक्रमांतूनच नवीन ज्ञानदालन तरुण पिढीपुढे उघडले जाते. सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने अशी प्रदर्शने वरचे वर भरविल्यास तरुण पिढीला त्याचा निश्चितच चांगल्याप्रकारे उपयोग होऊ शकेल.

विद्याप्रसारक मंडळाच्या परिसरात असे मौलिक उपक्रम बऱ्याचदा राबविले जातात. महाविद्यालयातल्या विद्यार्थ्यांना तर त्यांचा अतिशय उपयोग होतो. तसे पाहिले तर कॉलेजमध्ये असंख्य क्षण येतात अन् जातात, पण विद्याप्रसारक मंडळाच्या परिसरात जे अनेक चांगले क्षण अनुभवाला आलेले व अनुभवायला मिळालेले आहेत त्यापैकी एक क्षण -हे ग्रंथप्रदर्शन पाहण्याचा.

•••

(पान क्र. २० वरून)

**सन २०४७ ची भारताची बखर**

येथील न्यायव्यवस्था ही सामान्य माणसाला समजण्याइतकी सोपी नाही. कोर्टामध्ये 'वकील' संज्ञेच्या इसमास महत्त्व आहे. तो प्रथम कोर्टाला केस समजावून देतो व नंतर पुस्तकातून कायदा समजावून देतो. कोर्ट, पक्षकार व वकील यांची समज पटल्यावर न्याय दिला जातो. कालहरण हा या न्यायप्रक्रियेतील महत्वाचा भाग आहे. यालाच तारखा देणे, तारखा पडणे, अशी नावे आहेत. जितक्या तारखा जास्त तितका न्याय पक्का असा समज आहे. इ.स. २००० च्या केसेस निदान २०५० पर्यंत संपवाव्या असा ठराव विधिज्ञ परिषदेने नुकताच संमत केला. येथील वकील जागेअभावी कोर्टाबाहेरच उभे राहतात व अशिलांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करतात. अनेक गुन्हेगार व सभ्य माणसे 'अटकपूर्व जामीन' या तरतुदीचा फायदा घेतात. वकिलांची फी ही अशिलाच्या सांपत्तिक स्थितीवर अवलंबून असते. एकूण न्याय व्यवस्था उत्तम आहे. जुन्या, अंधाऱ्या जागेत भरणाऱ्या न्यायालयांमुळे गंभीरता व उदासीनता यांचा परिणाम न्यायव्यवस्थेवर झाला आहे.

भारतात काही दशकांपूर्वी अणुचाचण्या घेण्यात आल्या. कोणीच युद्ध करीत नसल्याने सर्व अणुबॉम्ब पडून आहेत. व ते कोठे ठेवावेत याबद्दल भारतसरकार चिंतेत आहे. या विषयात अमेरिका, रशिया व इतर युरोपीयन देशांचे सहकार्य घेण्यात येत आहे.

येथे बखरीची पाने संपली आहेत. परंतु या बखरीत राज्यांच्या तपशीलवार अहवाल सापडला नाही. तो बहुधा पुढल्या पानांमध्ये असावा. भारता सारख्या महान देशाची १०० वर्षांची बखर इतक्या थोड्या पानांत संपणार नाही. यापुढील पाने सापडल्यास पुढे हे केव्हातरी सादर करीनच. मिळालेल्या पानांचा गोषवारा वाचकापर्यंत पोचावा यासाठीच या लिखाणाचा प्रपंच.

•••

# ऋषिप्रज्ञेचा हृद्य आविष्कार
# नासदीय सूक्त -ऋग्वेद १०.१२९

डॉ. प्र.वि. पाठक

हजारो वर्षांची परंपरा असलेल्या वैदिक साहित्याला सर्व भारतीयांच्या जनमानसात अमिट स्थान आहे. वेदांविषयी विशेष कल्पना नसली तरी त्यात काही तरी गूढ, काही अलौकिक, काही अनाकलनीय ज्ञान आहे अशी बहुतेकांची धारणा असते. वेदमंत्रांचा सस्वर होणारा घोष अनेकांना भारून टाकतो. आणि जेव्हा कोणी एखाद्या वेदविद्येच्या जाणकाराशी बोलतो तेव्हा त्याची महतीच त्याला ऐकायला मिळून वैदिक साहित्याविषयी आदरभाव वाढण्यास मदत होते.

वेदांमध्ये खरोखरीच असे अत्यंत गूढ आणि गंभीर आणि अलौकिक विषय आहेत आणि भारतीयांची ती धारणा बरोबरच आहे. अध्यात्म आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील विद्वान ऋषिप्रज्ञेचा गौरव करतात तो अनाठायी नाही. ज्या गूढ सूक्तांचा हजारो वर्षांपूर्वी ऋषिप्रज्ञेतून आविष्कार झाला ती गूढ सूक्ते आज विसाव्या शतकात विज्ञानाच्या प्रगतीमुळे काही अंशी उलगडली आहेत असे दिसते.

ऋग्वेद साहित्यात अत्यंत गूढ मानले गेलेले आणि त्यामुळे अनेक थोर विद्वानांच्या अभ्यासचिंतनाचा विषय असलेले दहाव्या मंडळातील नासदीय सूक्त आधुनिक विश्वोत्पत्तिशास्त्राच्या आधारे उलगडले जाऊ शकते. या नासदीय सूक्तावर ऋग्वेदावर सखोल भाष्य करणाऱ्या सायणाचार्यांची विस्तृत टीका आहे. मराठीत अहिताग्नि राजवाडे यांनी नासदीय सूक्ताची भूमिका विषद करण्यासाठी तीन खंडांत विस्तृत भाष्य लिहिले आहे. असे हे नासदीय सूक्त केवळ ७ ऋचांचे असले तरी त्यात सामावलेला अर्थ फार विस्तृत आहे.

नासदीय सूक्तात आलेले विश्वोत्पत्तिविषयक ज्ञान हे सूत्ररूपाने आले आहे. जसे $E=mc^2$ या दोन पदांच्या समीकरणाला समजून घ्यायचे असल्यास सापेक्षतावादाची माहिती पाहिजे पण सामान्य माणसाला वस्तुमानाची प्रचंड ऊर्जा होऊ शकते असे सोपे स्पष्टीकरण मिळू शकते, तोच प्रकार नासदीय सूक्ताचा आहे. त्याची गूढता उलगडण्यासाठी विश्वोत्पत्तिशास्त्राची मदत घ्यावी लागते.

या सूक्ताचे द्रष्टे ऋषी प्रजापती परमेष्ठी आहेत. वैदिक ऋषींना द्रष्टे म्हणतात. यामागची भूमिका आहे की त्यांना ह्या ऋचा-सूक्ते आपल्या प्रज्ञाचक्षुंपुढे दृष्टिगोचर झाली. त्यात वैश्विक सत्याचे दर्शन होते. ह्या ट ला ट फ ला फ लावून रचलेल्या कविता नाहीत. वैदिक वाङ्मय छंदोबद्ध असले तरी काही रूपे ही साहित्यिक संस्कृताच्या नियमात बसत नाहीत. मात्र परंपरेने ती जशी म्हणत आले आहेत तशीच ती म्हणण्याचा प्रघात आहे. त्यामागची वैदिक ऋषींची भूमिका काय होती. छंदोबद्ध व्याकरणशुद्ध संस्कृत रचना करणाऱ्या ऋषींनी व त्यांच्या शिष्यांनीही त्यात बदल का केला नाही हे मात्र अजूनही गूढ आहे. वैदिक ऋषिंची भावनाही ह्या सूक्तांचा अविष्कार करतांना ते अलौकिक आहेत अशीच असावी.

ऋग्वेदातील इतर अनेक सूक्तांना त्या सूक्तांच्या इन्द्र, अग्नी, वरुण इ. देवता असतात. या सूक्ताला मात्र अशी नाम रूप असलेली देवता नाही. त्या सूक्ताची देवता भाववृत्तम अशी आहे. कुठल्याही प्रकारच्या दृक्गोचर नामरूपात्मक अस्तित्वाच्या पलिकडे जाऊन विश्वाच्या मूळाशी असलेल्या कारणाचे भावात्मक विवरण या सूक्तात केले आहे. या सूक्तात विश्वोत्पत्तिकर्त्याच्या नावाचा उल्लेखही नाही तो ही असाच अगोचर पातळीवर ऋषिप्रज्ञेने अवगाहन केला आहे. म्हणूनही कदाचित या सूक्ताची देवता 'भाववृत्तम' असावी असे वाटते. त्या अनंत असीम अस्तित्वाची संकल्पना शब्दांनी करणे शक्य नाही असेही यात ध्वनित होते.

या सूक्ताचा छंद त्रिष्टुप छंद आहे. या सूक्ताच्या

पहिल्या आणि दुसऱ्या ऋचेत विश्वोत्पत्तीपूर्वी जे अस्तित्व होते त्याचे वर्णन केले आहे.

ऋचा १

नासदासीन्नो सदासीत्तदानीं नासद्रजो नो व्योमा परो यत् ।

किमावरीवः कुहं कस्य शर्मन्नम्भः किमासीद्गहनं गभीरम् ॥१॥

भारतीयांची फार प्राचीन काळापासून अशी धारणा आहे की ह्या जगाची उत्पत्ती, स्थिती आणि लय हे चक्र अनंत काळापासून सुरू आहे. या दरम्यान पृथ्वीवर अनेकदा प्रलय होऊन नवे मनू निर्माण होतात. नवी प्रजा जन्माला येते. असे चौदा मनू आणि त्यांची चौदा मन्वंतरे झाली की महाप्रलय होतो. ही सृष्टी ज्या महाकारणातून निर्माण झाली त्याच महाकारणात ती विलय पावते.

ह्या महाकारणात विलय पावली तर ते कोणत्या शब्दात वर्णन करता येईल ते कसे होते यांची संकल्पना पहिल्या ऋचेत केली आहे.

ऋषी म्हणतात ते अस्तित्व न असत् होते ना सत् होते. सत् या शब्दाचा अर्थ नामरूपात्मक दृश्य अदृश्य अशा सर्व प्रकारचे अस्तित्व. आपल्याला जे जड अस्तित्व इंद्रियाद्वारे अनुभवाला येते तसेच जो इन्द्रियातीत अनुभव येतो. त्याच प्रमाणे प्रत्यक्ष दृष्टिगोचर न होणारे परंतु आध्यात्मिक पातळीवर अनुभवास येणारी परा अस्तित्वे जसे इन्द्रादी देव हे ही या 'सत्' अस्तित्वात अंतर्भूत आहे.या महाप्रलयानंतर उरलेल्या अगम्य अस्तित्वात या कुठल्याही प्रकारच्या 'सत्' चा नामशेष नव्हता.

'असत्' या शब्दाने अस्तित्वात न येऊ शकणारे पण केवळ कल्पनेच्या द्वारे ज्यांचे आकलन होऊ शकते. असेही बुद्धिगम्य काही त्या वेळी अस्तित्वात नव्हते. भारतीय तत्त्वज्ञान आणि तर्कशास्त्रात असतांची तीन उदाहरणे दिली जातात. ती म्हणजे सशाचे शिंग, वंध्या पुत्र आणि खपुष्प. सशाची शरीररचना पाहता त्याच्या शरीरावर टणक शिंग उगविण्याची शक्यताच नाही. मात्र शिंग आहे आणि ससा आहे तेव्हा दोहोंना एकत्र करून कधीही अस्तित्वात न येणाऱ्या सशाच्या शिंगाची शशशृंगाचीकल्पनाच फक्त करता येते.

एखादी स्त्री काही शारीरिक दोषांमुळे प्रजननक्षम नसेल, वंध्या असेल तर तिला मूल होणे शक्यच नसते जोवर तिच्यावर काही औषधोपचार करून ती कमतरता दूर होत नाही. अर्थात आधुनिक विज्ञानाने शस्त्रक्रिया करून स्त्रीमधील दोष दूर केल्यास तिचे वंध्यत्व दूर केले जाऊ शकते. पण तो दोष दूर केल्यावर तिला वंध्या म्हणता येणार नाही. तेव्हा जी आजच्या वैद्यकीय भाषेत सांगायचे तर Clinically infertile आहे तिला पुत्र होण्याची केवळ कल्पना वंध्यापुत्र 'असत्' मध्ये मोडेल.

तिसरी संकल्पना आकाश पुष्प-खपुष्पाची आहे. सर्व आकाशाला व्यापून असणारे फूल अस्तित्वात येईल काय? जर त्यानेच सर्व विश्व व्यापले तर ते फूल ज्या वृक्षावर येईल त्याच्या फांद्या, पाने, मुळे इ. कुठे राहतील कारण पुष्प म्हटले की झाडावर उगवते. झाडाशिवाय फुलाचे अस्तित्व कल्पनातीत आहे म्हणून असे सर्व व्यापून उरणारे केवळ फूल अस्तित्वात असणे शक्य नाही. तेव्हा खपुष्प हे 'असत्' संकल्पनेमध्ये समाविष्ट होते.

ऋषींनी सत् बरोबर असत् असे दोन्ही अस्तित्वात नसल्याचे सांगितले त्यामागे त्यांचा हेतू असा होता की कुणाला वाटेल की जर नामरूपात्मक 'सत्' अस्तित्वात नव्हते तरी संकल्पनेने असू शकणारे असत् अस्तित्व त्या काळी कदाचित असू शकेल तेव्हा तेही नव्हते असे स्पष्ट सांगण्याचा त्यांचा हेतू आहे.

'रजः' या शब्दाचा अर्थ निरनिराळे लोक जसे सत्यलोक, गंधर्वलोक, पितृलोक इ. भारतीय परंपरेत सप्त स्वर्ग आणि सप्त पाताळ जड अस्तित्वाची कल्पना केली आहे. हे स्वर्ग आणि पाताळ जड अस्तित्वाच्या परे आहेत असे मानले गेले आहे. हे सर्व 'लोक' रजः नव्हते असे 'नासीद्रजः' या शब्दांनी व्यक्त केले आहे.

व्योम या शब्दाचा अर्थ अवकाश असा आहे. त्यामागची संकल्पना आधुनिक सापेक्षतावादाने अधिक स्पष्ट होते. आकाश म्हणजे दिसणारी, दृष्टिगोचर पोकळी आहे नामरूपात्मक आहे. पण अवकाश म्हणजे काळाच्या

(पान क्र. २६ वर)

# 'प्रोजेक्ट' बनविण्यासाठी ग्रंथालय साहाय्य

सौ. भारती जोशी

'प्रोजेक्ट' हा विषय तिसऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमात असतो. हा विषय अत्यंत आवश्यक व महत्वाचा असतो. त्यामुळे दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाच्या अभ्यासक्रमातील असलेली माहिती व ज्ञान एकत्रितपणे उपयोगात आणून हा 'प्रोजेक्ट' तयार होतो. यात विद्यार्थ्यांनी त्या विषयाचा अभ्यास केलेला असतो त्याची माहिती सविस्तर येते. या प्रोजेक्ट मुळे विषयाबद्दल आपणास माहिती आहे याचा विश्वास विद्यार्थ्यांना येतो व ही माहिती बरोबर कशी आहे हे त्यांना पटवून द्यायचे असते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो. याबरोबर ते सेमिनारसाठी ही transperncy उपयोगात आणू शकतात. परीक्षकांना त्यांनी प्रोजेक्ट संबंधी विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे द्यावी लागतात. त्यामुळे निवडलेल्या विषयाची सखोल माहिती त्या विद्यार्थ्यांना प्राप्त करून घ्यावी लागते.

या प्रोजेक्टची निवड होते तरी कशी ? प्रोजेक्ट एखादा विषय घेऊन पुढे करावा लागतो. हा विषय विद्यार्थ्यांनाच निवडावा लागतो. ते ४-५ विषय घेऊन त्यांच्या (गाईड) मार्गदर्शक शिक्षकांकडे जातात व त्यात जो विषय झालेला नाही व वेगळा आहे असे शिक्षक व विद्यार्थी ठरवून निवडतात. हे विषय त्या त्या कोर्सेसप्रमाणे घ्यावे लागतात. ग्रंथालयात असलेल्या विविध नियतकालिकांची मदत घेऊन विद्यार्थीहि विषय निवडतात. हे विषय घेऊन ते मार्गदर्शकशिक्षकाकडे जातात व त्यांतून एक विषय ते निवडतात व त्यांचा प्रोजेक्ट सुरु होतो. आता या प्रोजेक्टच्या विषयांचे स्वरूप कसे असते. विषय हा नेहमी त्या त्या कोर्सेसशी निगडीत असतो. उदा.केमिकल साठी 1) Safety in Chemical Industries 2) Pollution control aspects of Fertiliser Industries 3) Water treatment. इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीम साठी 1) Lamp Bank battery eliminator 2) Emergency tube light 3) Automatic water level controller. Instrumetation साठी 1) Canductivity Meter 2) Ultrasonic movement detector 3) Microprocessor green house conditionel Eletronics 1) Outdoor light controllers 2) Telephone answering machine 3) Telephone controlled switch.

वरील प्रमाणे उदाहरणासाठी मी काही त्या त्या विषयाचे प्रोजेक्ट दिले आहेत. त्याप्रमाणे हे विद्यार्थ्यांनी तयार केलेले आहेत. ह्यात माहिती diagrams इ. सर्व असते व शेवटी पुस्तकांची सूची असते. प्रोजेक्टचे स्वरूप एखाद्या पुस्तकासारखेच होते.

हे प्रोजेक्ट करताना विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची खूपच आवश्यकता भासते. किंबहुना ग्रंथालयाशिवाय विद्यार्थ्यांचे प्रोजेक्ट होऊ शकणार नाही असे म्हटले तरी ती अतिशयोक्ती होणार नाही. प्रोजेक्टचा विषय एकदा पक्का ठरला की विद्यार्थ्यांच्या ग्रंथालयात फेऱ्या वाढतात. कारण ग्रंथालयात त्यांना मागील अनेक वर्षापासून ते लेटेस्ट नियतकालिके मिळू शकतात. ही नियतकालिके ग्रंथालयांनी जपून ठेवलेली असतात. त्यांतून त्यांना विषय उपलब्ध होऊ शकतात. एखाद्या विषयासंबंधी काही नियतकालिकांमध्ये आले तर, त्याचे कात्रण नोटिस बोर्डवर ग्रंथालयातर्फे लागते. कधी कधी एखाद्या विशिष्ट विषयावरचे नियतकालिक निघते. मग त्या नियतकालीकांची details नोटिसबोर्डवर लावायचे काम ग्रंथालय करते. उत्पादकांचे किंवा कच्चा माल पुरवितात त्यांचे पत्ते, प्रॉडक्टची नावे विद्यार्थ्यांना ग्रंथालयात असलेल्या डिरेक्टरीतूनच मिळतात. संदर्भासाठी लागणारी इतर दुर्मिळ पुस्तके विद्यार्थ्यांना ग्रंथालयाशिवाय कोठे मिळणार ?

विद्यार्थ्यांना मागील वर्षाचे प्रोजेक्ट पहायचे असल्यास सूचीसकट कोड नं. टाकून ते ग्रंथालयात लावलेले असतात. विशिष्ट पद्धतीने ग्रंथालयात ते लावलेले असल्याने विद्यार्थ्यांना ते वेळ न जाता पटकन सापडतात. अशा पद्धतीने ग्रंथालयाचा विद्यार्थ्यांना प्रोजेक्ट मध्ये मदतीचा सिंहाचा वाटा असतो.

विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रोजेक्टसंबंधी ग्रंथालयातून विविध माहिती मिळू शकते. ही माहिती नवी जुनी नियतकालिके, पुस्तके, manuals, databooks, वृत्तपत्रे, डिरेक्टरीज इ.तून मिळू शकते. वरील माध्यमे ग्रंथालयात पद्धतशीर लावलेली असल्याने विद्यार्थ्यांना ती पटकन सापडतात. ग्रंथालयात उपलब्ध असलेल्या पुस्तकांची यादी त्याला Catalogue cards म्हणतात ती Cabinetमध्ये आध्यक्षरानुसार पुस्तकांच्या लेखकाच्या व पुस्तकाच्या नावानुसार लावलेली असतात. ते ही विद्यार्थी प्रोजेक्ट संबंधी बघू शकतात. एखाद्या विषयावर ग्रंथालयात विविध पुस्तके उपलब्ध आहेत ती विद्यार्थ्यांच्या दृष्टिपथात आणून देण्याचे काम ग्रंथालय करते.

प्रोजेक्ट करताना ग्रंथालय आपल्या खूप उपयोगी पडले ही जाणीव विद्यार्थ्यांच्या मनात असतेच ती ते त्यांचे प्रोजेक्ट झाले की प्रथम ग्रंथालयात दाखवायला आणून व्यक्त करतात. या प्रोजेक्टविषयी ग्रंथालयातून आपल्याला खूप मदत झाली ही जाणीव त्यांच्या मनात राहते. ती ते विद्यार्थी विसरत नाही. तंत्रनिकेतनातील शिक्षण संपवून ते विद्यार्थी मोठ्या जगात जातात तरी ते ग्रंथालयाला विसरत नाहीत. त्यांचे पुढील यश, नोकरी, त्यांची ध्येये हे सांगण्यासाठीच ग्रंथालयात येत राहतात. व हे विद्यार्थी -ग्रंथालयात शेवटपर्यंत राहतात. ग्रंथालयातील सर्व स्टाफही या विद्यार्थ्यांचे स्वागत करतो. त्यांच्या ग्रंथालयाविषयी असलेल्या भावनांना जपत राहून शुभेच्छा देत राहतो.

असे हे प्रोजेक्ट ग्रंथालयातील ग्रंथ विद्यार्थ्यांना वाचल्यास प्रवृत्त करणारे असतात. ग्रंथालय, मार्गदर्शक शिक्षक यांच्या मदतीने विद्यार्थी स्वतः मेहनत घेऊन हे 'प्रोजेक्ट' करतात.

•••

(पान क्र. २४ वर)

**ऋषिप्रज्ञेचा हा आविष्कार**

**नासदीय सूक्त -ऋग्वेद १०.१२९**

अस्तित्वासह येणारे त्रिमितिमय अस्तित्व. सापेक्षता वादाने Space time continum ची संकल्पना मांडली. ज्या ठिकाणी काळाचे अस्तित्व आहे त्या ठिकाणी तो काळ ज्या त्रिमितीय (Three dimensional frame of reference) संदर्भ चौकटीत मोजला जातो. तिच्या वेगाशी तो संलग्न असतो. मात्र प्रकाशाचा वेग या संदर्भ चौकटींच्या परे राहून स्थिर असतो अशी सापेक्षता सिद्धांतामागची गृहीत संकल्पना आहे. त्रिमितीय अवकाशयुक्त अस्तित्वही तेव्हा नव्हते हा भाव 'न व्योमा परोयत्' या शब्दांनी व्यक्त केला आहे.

इथवर आपण ऋचार्थ समजून घेतला. आता या संदर्भात आधुनिक विश्वोत्पत्तिशास्त्र काय म्हणते ते पाहू.

आधुनिक विश्वोत्पत्तीशास्त्राच्या महत्स्फोट (Big bang) संकल्पनेप्रमाणे हे दृष्टिगोचर असलेले अस्तित्व १५०० कोटी वर्षापूर्वी अस्तित्वात आले. तेव्हा पासून ते आजवर सतत प्रसरण पावते आहे. ह्या प्रसरणाचा वेग आकाशगंगांच्या एकमेकांपासून दूर पळण्याच्या वेगाच्या आधारे खगोल -विश्वोत्पत्ति शास्त्रज्ञांना मिळाला. त्यांनी त्याचे गणित मांडले आणि उलट्या दिशेने -आकुंचनाच्या दिशेने त्याची कालमर्यादा काढली त्यावरून त्यांना १५०० कोटी वर्षांचा अवधी मिळाला. या कालापूर्वी जे अस्तित्व होते त्याचे मोजमाप करतांना ज्या संख्या मिळाल्या त्या मात्र सामान्य संख्यांच्या पेक्षा वेगळ्या होत्या. त्या गणिताप्रमाणे महत् स्फोटापूर्वी या जगाचे वस्तुमान अनंत (infinite) घनता अनंततर आकारमान शून्यापर्यंत (tending to zero, -0) असे होते. या स्थितीला कुठल्याही प्रकारच्या गणिती साच्यात बसविता येत नाही. म्हणून वैज्ञानिकांनी त्या स्थितीला एकांतिक स्थिती असे म्हटले आहे. त्या स्थितीत ना ऊर्जा होती, ना प्रकाश होता कुठल्याही प्रकारच्या वैश्विक नियमांची गणिते या स्थितीला state of singularity लागू होत नाहीत. ही वर्णनातीत स्थिती आहे असे आधुनिक विश्वोत्पत्तिशास्त्रज्ञही म्हणतात तोच भावनासदीय सूक्ताच्या वरील ऋचार्थात आला आहे.

•••

# मला झपाटून टाकणारे पुस्तक
# 'मेड इन जपान, अकियो मॉरिटा आणि सोनी'

श्री. वासुदेव देशपांडे

अनेक पुस्तके आपल्या डोळ्याखालून जातात. पण फारच थोड्या पुस्तकांचा आपल्यावर प्रभाव पडतो. असेच एक झपाटून टाकणारे पुस्तक आहे 'मेड इन जपान, अकियो मॉरिटा आणि सोनी' अकियो मॉरिटा हे स्वतःच या पुस्तकाचे लेखक आहेत. हे एक आत्मचरित्र आहे. अर्थात स्वतःच्या आयुष्याबद्दल सांगताना श्री. मॉरिटा यांनी सोनी कॉर्पोरेशनबद्दलही भरपूर सांगितले आहे. अकियो यांचे आयुष्य 'बिझी-नेस' ने भरून निघालेले आहे. लहानपणापासून व्यवसाय कसा करावा याचे प्रात्यक्षिक मॉरिटा यांना मिळाले. त्यांच्या घराण्याचा 'सेक' (एक जपानी पारंपारिक मध) व 'सोया सॉस' बनवण्याचा व्यवसाय होता. त्यामुळे त्यांचे घराणे अतिशय श्रीमंत झाले. लहानपणी मिळालेल्या या प्रशिक्षणाचा उपयोग त्यांनतर मोठेपणी 'सोनी कॉर्पोरेशनचा' विकास करताना झाला. 'टोकियो टेलिकम्युनिकेशन्स इंजिनिअरिंग कार्पोरेशन' या नावाची एक कंपनी अकियो मॉरिटा व त्यांचे मित्र श्री. इशुका नेसाकी यांनी १९४६ मध्ये स्थापन केली. ही कंपनी घडवण्यात मॉरिटा यांचा सिंहाचा वाटा होता. नंतर कंपनीचे हे मालगाडीसारखे नाव बदलून नवीन नाव श्री. मॉरिटा यांनी 'सोनी कार्पोरेशन' असे ठेवले.

श्री. ओकियो यांनी त्यांच्या या पुस्तकात त्यांचे विचार, कल्पना आणि अनुभव अतिशय प्रभावी शब्दांत व्यक्त केले आहेत.

हे पुस्तक एका अर्थी पाठ्यपुस्तकआहे. वेगळ्या शब्दात सांगायचे तर एक 'प्रॅक्टिकल हॅण्डबुक' आहे. सद्य शिक्षणपद्धतीचे जे तत्व आहे 'मनोरंजनातून शिक्षण' हे या पुस्तकात यशस्वी झाले आहे. जपानी मॅनेजमेंट पद्धतीबद्दल किंवा एकूणच सर्वच प्रकारच्या मॅनेजमेंट बद्दल या पुस्तकातून बरीच माहिती मिळते. आपल्याला हे ऐकून कदाचित गंमत वाटेल की भारतीय 'एकत्रित हिंदु कुटुंब' व्यवसायाप्रमाणे जपानमधला घराण्याचा व्यवसाय हा थोरल्या मुलाकडे व नंतर त्याच्या थोरल्यामुलाकडे जातो आणि आणखी एक गमतीची गोष्ट म्हणजे एकदा एखाद्या व्यक्तीची नेमणूक झाली की त्या व्यक्तीला कामातून मध्येच काढून टाकत नाहीत. अर्थात गैरवर्तनाबद्दल शिक्षा आहेत पण शक्यतो नोकरीवरून कोणाला कमी करीत नाहीत. या वैशिष्ट्यपूर्ण तत्त्वप्रणालीमुळे मॉरिटो यांना काही अडचणीही आल्या. एकदा एका अमेरिकन उद्योगपतीने मॉरिटा यांना ३०,००० रेडिओ बनवून देण्याची ऑर्डर दिली व त्यांचे तसे कोटेशन मागितले. मॉरिटा यांनी हॉटेलच्या रूमवर जाऊन बराच वेळ विचार करून असे एक वैशिष्ट्यपूर्ण कोटेशन तयार केले की जे पाहून तो उद्योगपती चाटच पडला. त्या कोटेशनप्रमाणे जितकी मालाची रक्कम जास्त तितकी प्रति युनिट किंमत जास्त असा प्रकार होता त्या उद्योगपतीने मॉरिटो यांना प्रयत्नपूर्वक शांतपणे सांगितले की गेल्या ३० वर्षात असले भयंकर कोटेशन त्याने प्रथमच पाहिले. मग मॉरिटो यांनी त्याला समजावले की जपानमध्ये ते या एका ऑर्डरच्या दृष्टी कोनातून कोणाचीही नेमणूक करू शकत नाहीत. त्या वेळी तो उद्योगपती उद्गारला,' कदाचित हाच फरक आहे जपानी आणि अमेरिकन समाजात' माझेही त्या क्षणी व अजूनही तेच मत आहे.

अशा अनेक उदाहरणांवरून जपानी संस्कृतीचा मागोवा श्री. मॉरिटा यांनी घेतला आहे आणि उरलेल्या अनेक उदाहरणांवरून एखादी संस्था कशी चालवावी इथपासून ते नातेसंबंध कसे टिकवावे इथपर्यंत अनुभवाचे बोल कथन केले आहेत. अधिकाऱ्यांना कर्मचाऱ्यांपासून

सदोदित वेगळे ठेवू नये पण अधिकारी आणि कर्मचारी यांच्यात अद्वैतही निर्माण होऊ देऊ नये या व अशा अनेक गोष्टी श्री. मॉरिटा यांनी व्यवस्थित समजावून सांगितल्या आहेत.

जपानने गेल्या ५० वर्षांत ही जी घोडदौड केली तिचे श्रेय जपानच्या गुणवत्तासन्मुख समाजव्यवस्थेकडे जाते. कदाचित याच गोष्टीची भारतात आज गरज आहे. इतकेच नव्हे तर भारतात आज आवश्यक असलेल्या राष्ट्राभिमान नावाच्या एका दुर्मिळ गुणाची जपानी समाजाने जी परीक्षा दिली त्यानेही तो समाज गेल्या ५० वर्षांत बराच पुढे आला आहे.

सोनी कंपनीच्या उत्पादनांच्या कमी किंमतीबद्दल कधीच अपकीर्ती नव्हती. अकियो यांनी उपभोग्य वस्तूंबद्दलचे आपले धोरण 'उत्कृष्ट दर्जा ' व वाजवी किंमत या शब्दात वर्णन केले आहे. त्यांच्या अनेक प्रतिस्पर्धी मित्रांनी त्यांना या धोरणाद्वारे फारसा फायदा होत नाही अशी जाणीव करून दिली. पण अकियोंच्या अनुभवांनी त्यांना निराळीच जाणीव झाली. तात्पुरता फायदा हा अक्षरशः तात्पुरता असतो. पण दर्जेदार वस्तूंच्या विक्रीमुळे बाजारात तुमचे जे नाव होते तेच बराच काळ उपयोगी पडू शकते. एकदा दुसऱ्या एका अमेरिकन उद्योगपतीने मॉरिटा यांना बरीच मोठी ऑर्डर दिली व किंमतही भरपूर द्यायचे कबूल केले. पण अट एकच होती की उत्पादनांवर सोनी कंपनीच्या नावाऐवजी त्या उद्योगपतीच्या कंपनीचे नाव घालावे. अकियो यांनी ती ऑफर नाकारली.

असे म्हटले जाते की गरज ही शोधाची जननी आहे. अकियोंनी त्याचा पुरेपूर अनुभव घेतला. त्यांनी अमेरिकन टेपरेकॉर्डवरून जपानी टेपरेकॉर्डर बनवले. पण जपानमध्ये ते विकत घ्यायला कोणी तयार नव्हते. प्रत्येक जण त्याला एक खेळणेच समजत असे. त्याच वेळी त्यांनी हेरले की जपानच्या न्यायालयांमध्ये शॉर्टहॅण्ड-टायपिस्ट ची कमतरता आहे. त्या संधीचा वापर करून घेण्यासाठी मॉरिटा यांनी जपानच्या सर्वोच्च न्यायालयात टेपरेकॉर्ड चे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्याबरोबरच जपानी न्यायालयातून शॉर्टहॅण्ड-टायपिस्टना पर्याय म्हणून टेपरेकॉर्डरची मागणी आली. युद्धामुळे शाळांमधून प्रशिक्षित शिक्षकांचीही कमतरता भासत होती. त्याचाही फायदा मॉरिटा यांनी उठवला. नंतर त्यांच्या लक्षात आले की या यंत्राचा सर्वोत्कृष्ट उपयोग नकळत त्यांच्या हातून होत गेला.

अकियोंनी स्वतःच्या घराबद्दल व स्वतःबद्दल सुद्धा लिहिले आहे. युद्धापूर्वी नागोया या त्यांच्या शहरी त्यांचे घराणे सगळ्यांत श्रीमंत होते. पण युद्धानंतर फक्त नागोयाच्या नागरिकांनी मिळून उभारलेला त्यांच्या पणजोबांचा पुतळा तेवढा शिल्लक राहिला. जपानमध्ये पुतळे उभारण्याची प्रथा फारशी नाही ! अकियो हे घरातले सर्वात थोरले चिरंजीव असूनही त्यांना त्यांच्या वडिलांनी स्वतःचा व्यवसाय चालवण्यास परवानगी दिली.' हा सुद्धा जपानच्या विकासातला एक भागच ' असे अकियोंनी या घटनेचे वर्णन केले आहे.

एक संस्थाचालक म्हणून अकियोंची जडणघडण लहानपणापासून सुरू झाली. वडिलांबरोबर घरचा व्यवसायही त्यांनी सांभाळला. अकियोंनी अर्थशास्त्रात प्रवीण व्हावे अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. पण भौतिक शास्त्रात पदवी घेण्याच्या आपल्या मुलाच्या इच्छेला त्यांनी कधीही विरोध दर्शविला नाही. अकियोंनी त्याबद्दलही आपली कृतज्ञता व्यक्त केली आहे. 'नकळत माझ्या वडलांनी व्यवस्थापन शिकवले.' असे त्यांनी वडिलांबद्दल कृतज्ञोद्गार काढले आहेत.

प्रत्येक व्यक्तिने स्वतःचा उपयोग स्वतःच शोधून काढला पाहिजे. हे तत्त्व अकियोंनी पुस्तकात वेळोवेळी विशद केले आहे.

या तत्त्वाचा माझ्यावर सगळ्यात जास्त प्रभाव पडला. आयुष्य जगताना याच तत्वाचा सतत वापर केला पाहिजे असे मला वाटते. लेखाच्या सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे फार थोडी पुस्तके आपल्यावर छाप पाडतात. कारण ती आपल्याला पटतात. 'जगात अशक्य असे काहीच नाही फक्त प्रत्यक्ष कार्य करणे गरजेच आहे' हा आशादायक संदेश या पुस्तकातून मिळतो.

'सोनी कॉर्पोरेशन' गुणवत्तेबद्दल किती जागरूक व प्रसिद्ध आहे याची कल्पना हे पुस्तक वाचताना येते.

•••

# आजचे युवा मानस

प्रा. मोहन पाटक
शब्दांकन : नेत्रा जोशी

आजचा युवक या संदर्भात विचार करता आजच्या युवकांबाबत समाजात सर्वसाधारणपणे जे उल्लेख केले जातात ते चटकन आठवतात. उदा. ''आजची तरुण पिढी वैफल्यग्रस्त आहे'' '' आजच्या तरुण पिढी समोर चांगले आदर्श नसल्याने ती दिशाहीन झालेली आहे.'' किंवा '' आजचा तरुण गर्दसारख्या भयानक व्यसनांच्या गर्तेत सापडला आहे.'' इ. उल्लेखांचा विचार करू जाता आजच्या तरुणाची मानसिकता दोषपूर्ण झाली असावी किंवा त्यांचे केले जाणारे मूल्यमापन चुकीचे तरी असावे असे म्हणावे लागेल. मनावर ज्या वयात संस्कार होतात, त्याच वयात कधीकधी जर एक, दिशाहीन टप्पा निर्माण झाला तर युवापिढी ही वैफल्यग्रस्त बनण्याची दाट शक्यता असते.

आजचा युवक मोठ्या प्रमाणार व्यसनाधीनतेकडे झुकत आहे असे म्हटले जाते. परंतु आजची युवापिढी व्यसनाधीन आहे असे म्हणणे अतिव्याप्त ठरेल. सर्वच तरुण काही व्यसनांच्या गर्तेत सापडलेले असतात असे नाही. विधायक कार्यात सहभागी होणारे पुष्कळ तरुण सर्व क्षेत्रात आहेतच की.

शिवाय व्यसनाधीनता आणि व्यसन या शब्दांचाही थोडा विचार केला पाहिजे. एखाद्या व्यसनाच्या विळख्यात सापडणे, withdrawal symptoms चा त्रास होणे, त्या व्यसनावरच अवलंबून राहणे आणि वाईट समजल्या जाणाऱ्या व्यसनांवर पूर्ण ताबा असणे, विरंगुळा म्हणून एखादे व्यसन करणे यांत फरक असतो. सरसकट सगळ्यांनाच 'व्यसनाधीन' हा शब्द वापरणे तितकेसे बरोबर ठरणार नाही. अर्थातत या दोहोंतील सीमारेषा अतिशय नाजूक आहे. एकूणच माणूस हा स्खलनशील असल्याने पटकन व्यसनाधीन होऊ शकतो. पण मानसिक आरोग्य चांगले असेल तर व्यसन तुमच्यावर ताबा मिळवू शकत नाही. आता मानसिक आरोग्य चांगले असणे म्हणजे नेमके काय ? तर अनावश्यक ताणतणाव, चिंताग्रस्त, भीतिग्रस्त, असुरक्षिततेची भावना असणे, कोणत्याही स्वरूपाचा गंड (complex) असणे यातून मानसिक आरोग्य बिघडू शकते. पण ते चांगले राहण्यासाठी अनेक घटकांची अनुकूलता असायला हवी. अशा अनुकूल घटकांची सामाजिक परिस्थिती आपल्याकडे कमी होत चालली आहे. त्यामुळे आजचा तरुण युवक गर्दसारख्या व्यसनांकडे वळण्याची शक्यता वाढत आहे.

युवा मनावर आपला प्रभाव पडविणारे घटक अनेक असू शकतात. त्यांचे स्वरूपही अतिशय गुंतागुंतीचे आहे. उदा. समाजजीवनात सर्वच क्षेत्रात होणारा जीवनमूल्यांचा ह्रास, पैशाच्या मागे धावत सुटण्याची हाव, अनावश्यक गरजा, कुटुंबातील पालकांची भूमिका (Role) इ. प्रकारचे घटक आहेत. आज युवावस्थेत असणाऱ्या पिढीचे बालपण हा ही महत्त्वाचा विषय आहे. आपल्या मुलाचे फाजील लाड करणारे, त्याला नको तेवढ्या सुखसुविधा पुरविणारे व पैशाचा निर्बंध न ठेवता, 'शेवटी काय, मुलांसाठीच तर सर्व असतं' असे समजणारे पालक त्या मुलाला झगडण्याची जिद्द शिकवित नाहीत. त्याला केवळ पुस्तकातला किडा बनवीत अवलंबित्व वाढवीत राहतात. व त्याची युवावस्था सदोष करण्यास कारणीभूत ठरतात. याउलट मुलाला कायम धाकात ठेवणारे, त्याला आवश्यक असणारे 'पॉकेटमनी' चे पैसेही न देणारे व 'बघा, आमचा मुलगा कसा धाकात आहे' याची फुशारकी मारणारे पालक त्या मुलाचे मानसिक आरोग्य बिघडविणारे घटक असतात.

शिवाय संगत हाही एक घटक आहे. याबरही पालकांचे लक्ष असणे आवश्यक असते. त्यामुळे सरसकट सर्व दोष मुलांना देण्यापेक्षा त्यांची मानसिकता समजून घेऊन त्यांना मार्गदर्शन करणे उपयुक्त ठरू शकते.

आजचा युवक दिशाहीन आहे असेही एक विधान नेहमी केले जाते. पण असे विधान करताना दिशाहीनतेशी निगडित असणारे घटक पुन्हा लक्षात घेतले पाहिजेत. युवा मनावर होणारे संस्कार, त्यांना ज्या स्पर्धांना सामोरे

जावे लागत आहे. त्या स्पर्धांचे स्वरूप आणि समाजात त्यांना उपलब्ध असणाऱ्या संधी या सर्वांचा युवकांच्या दिशाहीनतेशी संबंध असतो.

लहान वयापासून, 'तू पहिला आला पाहिजेस, पैकीच्या पैकी मार्क मिळवलेच पाहिजेस' असे मनावर ठसवणारे पालक, नातेवाईक अपेक्षांचे एक ओझे त्याच्यावर लादत असतात. त्या मुलाच्या नैसर्गिक क्षमता, कुवत यांचा जराही विचार केला जात नाही. त्यामुळेच कायम एका तणावाखाली त्या व्यक्तित्वाची वाढ होते. असे तणाव केवळ अभ्यासाबाबत नाही तर शेजारपाजारच्या मुलांशी त्यांची तुलना करण्यातून, त्याला सतत हिणवण्यातून किंवा अन्य कोणत्याही कारणातून निर्माण केले जातात. हे तणाव सर्वस्वी अनावश्यक असतात. पालकांच्या या अपेक्षा पूर्ण न करू शकणारा युवक साहजिकच लवकर वैफल्यग्रस्त होतो. यापेक्षा त्या तरुणाला, येणाऱ्या प्रसंगांना सामोरे जाण्याचे कसब आत्मसात करण्यास मदत करणे, त्याच्यात आत्मविश्वास निर्माण करणे हे पालकांचे कर्तव्य आहे.

आपल्याकडील पालक मुलाचे मार्गदर्शक बनत नाहीत तर मालक बनून वागतात. यातच बऱ्याच समस्यांचे मूळ आहे. मला आयुष्यात एखादी गोष्ट जमली नाही तर ती माझ्या मुलाला/मुलीला जमावी अशी इच्छा बाळगताना पालक मुलांच्या मनाचा विचार करीत नाहीत. अगदी टी.व्ही. लावावा/न लावावा, फॅशन कोणत्या कराव्या इ. विविध गोष्टीत पालक मुलांच्यावर अपेक्षा लादतात व तणाव वाढत जातात. आपल्याकडील असे अनावश्यक ताणतणाव पुष्कळ समस्या निर्माण करण्यास कारणीभूत ठरतात. अडाणी पालकत्व हे दिशाहीनतेमागील एक महत्त्वाचे कारण ठरू शकते. तरुणांना साहसाची असणारी निसर्गसुलभ आवड लक्षात घेऊन त्यांना तशा संधी देणे, तुमच्या व त्यांच्या पिढीतील अंतर (Generation Gap) कमीत कमी करणे हे स्वतः पालकांनी केले तर संघर्ष आपोआपच कमी होतील.

जीवनात येणाऱ्या थोड्याशा अपयशानेही आजचा युवक खचून जातो. परंतु नीट विचार केला तर आपल्याला समजेल की जीवनात सदैव यशस्वी होत रहावे हे wishful thinking आहे. परंतु वास्तव इतके साधे नसते. कोणत्या ना कोणत्या टप्प्यावर माणसाला अपयशही पचवावे लागते. परीक्षेचा निकाल नकारात्मक लागला की आत्महत्या, प्रेमभंग झाला की आत्महत्या इ. प्रकारच्या बातम्यांतून युवकाची जी मनोव्यथा जाणवते ती पाहता अपयशाकडे पाहण्याची दृष्टी आजच्या युवकात नाही हे स्पष्ट होईल. जीवन म्हटल्यावर यशापयाचे क्षण येणे अपरिहार्य असते. परंतु अपयशाकडे वेगळ्या चश्म्यातून पाहून त्याला भिडणे व न खचता पुढील मार्ग शोधणे याची दृष्टी त्याकरिता विकसित व्हावी लागते. आपल्या शिक्षणातून अशी दृष्टी त्याला मिळणे आवश्यक आहे.

दुसरे असे की आपल्या मनावर असणाऱ्या तणावांचे व्यवस्थापन व वेळेचे व्यवस्थापन करण्याची युवा मनाला सवय लावणे आज गरजेचे आहे. या सवयीच्या अभावाला समाजही तितकाच जबाबदार आहे. आज प्रत्येकाला देता येतील इतकी विधायक कामे आपल्याकडे आहेत, पण श्रमप्रतिष्ठेच्या चुकीच्या कल्पना, व्यवसायविषयक भ्रामक कल्पना आपण बाळगतो आणि मग बेकारांची संख्या वाढत जाते.

आजच्या युवा मानसशास्त्रावर लैंगिकतेचा, हिंसाचाराचा प्रभाव आपल्याला जाणवतो. त्यामागे माध्यमांचे कारण जसे आहे तसेच चुकीच्या कल्पना, शिक्षणाचा अभाव, इ. कारणेही आहेत. विशेषतः हिंसाचाराचे धडे तर आपण नकळत बालवयात देत राहतो व परिणामी मोठ्या खूनखटल्यांची कहाणी तयार होत रहाते. लैंगिक विषयांकडे पाहण्याचा विकृत दृष्टिकोण तर अधिक घातक असतो.

एकंदरीत आजच्या युवा मानसाचा विचार करू जाता आजच्या काहीशा संभ्रमित अवस्थेला अनेक घटक कारणीभूत आहेत. युवक स्वतः कारणीभूत असतीलच तर अगदी अल्प प्रमाणात. युवा मनात जर समाजाने सत्य, शिव, सुंदर याचे बीज रोवले तर होणारी वाढ एका निकोप वृक्षाची असू शकते. त्याकरता भ्रष्टाचार किंवा मूल्यविहीनता अशा भोवऱ्यात सापडलेल्या समाजाने स्वतः काही संकेत पाळण्याची गरज आहे. अन्यथा गर्दसारख्या व्यसनांचे राक्षस समाजाची युवावस्था सहज गिळंकृत करू शकतील.

• • •

# २१ व्या शतकातील भारतापुढील आव्हाने

श्री. गणेश खराडे

'रणाविना स्वातंत्र्य कोणा मिळाले' असे वचन जरी असले तरी भारताने अगदी वेगळ्या प्रकारचा लढा देऊन स्वातंत्र्य प्राप्त केले. आज त्या स्वातंत्र्याला प्राप्त करुन अर्ध शतक जरी झाले असले तरीही डोक्यावर सतत टांगती तलवार ही आहेच. स्वराज्याची लढाई जरी संपली असली तरी सुराज्य करण्यासाठी युद्ध चालूच आहेच. नियतीशी करार केला असला तरीही भविष्यात आव्हानांची मालिकाच आमच्या समोर हिमनगासारखी उभी आहे. ही आव्हाने आजही सतावीत आहेत आणि आपण २१व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे आहोत तेव्हा २१ व्या शतकात सुद्धा तीच व आणखी नवीन आव्हाने आम्हाला भेडसावीत राहणार. क्यु की ये इंडिया है। त्यामुळे भारताची प्रगती ही गोगलगाईच्या पावलासारखी होते.

आमच्या देशात केंद्र सरकार, घटक राज्य सरकार असून त्यात विविध पक्षांचे वर्चस्व आहे, त्यामुळे एकसंघ विचारप्रणालीचा आभाव आढळतो. आम्ही संसदीय लोकशाही पद्धती स्वीकारली असली तरी देशातील राजकीय पक्षांत इतकी कुटिलता आहे कि जे पक्ष आपल्या पक्षातच लोकशाही टिकवू शकत नाही ते संपूर्ण देशात काय लोकशाही राबवणार ? राजकारण्याची करामत खादीत नसून गादीत आहे याची. उदाहरणे प्रत्ययाला येतात, शेअर्स, बोफर्स, युरिया प्रकरण, पशुखाद्य घोटाळा या सारखे घोटाळे घडून राष्ट्रीय संपत्तीची उधळणूक होते. कित्येक वाईट गोष्टी करून सरकार लुबाडण्याचे काम चालत आहे. पुढेही चालत राहणार आहे. त्यामुळे लोकशाही लोकांपासून दूर होत चालली आहे. त्यामुळे लोकशाहीची व्याख्याही बदलून Democracy is the Government of the People, by the People, for the People अशी करावीशी वाटते, तेव्हा लोकशाहीच्या समृद्धते साठी And miles to go before I sleep अशा प्रकारच्या आचरणाची आवश्यकता आज भासत आहे आणि भविष्यातही भासतच राहणार आहे. आम्हाला स्वातंत्र्य हे केवळ राजकीय व शारीरिक स्वरूपांचे मिळाले आहे. परंतु मानसिक आणि वैचारिक स्थिती अजूनही गुलामगिरीतच खितपत पडली आहे. आज न्यायसंस्थेवर भ्रष्टाचाराचा आरोप होतो तर त्यात भ्रष्टाचारही होतो. तर दुसरीकडे देशाला स्थिर सरकार लाभत नाही. एका वर्षात तीन पंतप्रधान बदलतात पुन्हा निवडणुका घेण्याची पाळी येते ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

शिक्षण : आज सर्वसामान्यांना सहज शक्य होणारे चिरंतर टिकणारे आणि आमच्या मातीतून उगविलेले शिक्षण निर्माण करण्याची गरज आहे. आज अनुदानित महाविद्यालातून विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जाते, परंतु विद्यार्थी त्या शिक्षणाद्वारे आपल्या बुद्धिमत्तेच्या प्रगल्भतेचा वापर भारतासाठी करावयाचा सोडून परदेशी स्थाईक होऊन त्या देशाच्या प्रगतीसाठी करतात. व याचे प्रमाण दिवसे दिवस वाढत चालले आहे. आज भारतातील शिक्षणपद्धतीतून परीक्षार्थी निर्माण होत आहेत ज्ञानार्थी नाहीत. याच कारण डिग्रीच्या कागदावरून व्यक्तीच्या मोजमापाच्या प्रवृत्तीने उच्छांक मांडला आहे. त्यामुळे तो डोळ्याला झापड लावलेल्या घोड्यासारखा मार्गक्रमण करीत आहे. तो कलेपासून दूरावला आहे. त्याची दशा

'साहित्य संगीत कला विहीन : ।
साक्षात पशु: पुच्छविषणहीन: ॥'

म्हणजे साहित्य संगीत कलाविना असलेला माणूस हा शेपूट नसलेल्या पशूसारखाच आहे. तसा तो पशू होत चालला आहे. त्यातही काही कलेचे चाहते असले तरी सध्या कलेच्या क्षेत्रात चाली चोरीच प्रमाण वाढले आहे. त्यामुळे खरा कलावंत हा जन्माला येणार नाही कारण जमाना इन्स्टंटचा आहे, या जमान्यात त्याला सारे काही आयत हवं असते. त्यामुळे- Genius is one percent inspiration and Ninetynine percent perspiration म्हणजेच अलौकिक बुद्धिमत्ता म्हणजे एक टक्का स्फूर्ती

आणि नव्याण्णव टक्के परिश्रम यांचा मेळ असतो हे तो विसरत चालला आहे. तेव्हा त्याला ज्ञान प्रतिष्ठा संपत्ती, ही कशी प्राप्त होणार.

आज स्त्रीयांना वासनापूर्तीची वस्तू मानणाऱ्या राक्षसी प्रवृत्तीचे स्तोम माजत चालले आहे. आणि भारतीय स्त्रियांच्या संदर्भात आज दुर्दैवाने म्हटले जाते की 'हायरे भारतीय नारी तेरी अजब कहानी पहले चुल्हेमे जलती थी अब तंदूर में पकती है ।' दुसरीकडे स्त्री ही मुख्यमंत्री किंवा नगरसेविका झाली असली तरी सूत्र हलवीणारी भलतीच लोकं असतात. मग कुठे ही स्त्री स्वतंत्र्य झाली. आणि कधी मिळणार तीला स्वातंत्र्य, आज गर्भजल परिक्षा पद्धतीने गर्भ-निदान केले जाते, मुलगी असल्यास गर्भपात करण्यात येतो आज एकहजार पुरुषामागे ९२७ स्त्रिया. असं प्रमाण आहे हे वाढतच राहिले तर २१ व्या शतकात याचे दुष्परिणाम काय होतील याची कल्पनाच करवत नाही.

आज भाषा-वाद, धर्म-वाद, जातीय वाद, प्रांत वाद, प्रादेशिक अस्मितांचा टोकदारपणा यातून दंगली उद्‌भवतात व २१ व्या शतकात बोकाळणार नाहीत याची शाश्वती देणे कठीणच आहे.

कारण 'अहम् ब्रह्मास्मि' ही भावना प्रत्येक माणसावर त्याच्या माणुसकीवर मात करते आणि नंतर लोकधर्म नांवाची अफुची गोळी खाऊन 'स्वधर्मे निधनं श्रेयं परधर्मो भयावहः' या उक्तीप्रमाणे धर्मांचे अवडंबर माजवून स्वार्थ साधायला सिद्ध होतात.

सध्याचे लोकसंख्येचे वाढते प्रमाण पाहता असे दिसून येते की लोकलमधून प्रवास करणारी लोकं माकडांनी जसं झाडांच्या फांद्याना लोंबकळांव तशी लोकलच्या दारंखिडक्यांना लटकून व टपावर बसून प्रवास करीत असतात. व हीच परिस्थिती २१ व्या शतकातही असेल आपण लोकसंख्येच्या बाबतीत चीनला मागे टाकून पहिल्या क्रमांकावर असलो तरीही त्या वाढत जाणाऱ्या (आज ८७ कोटींहून अधिक वाढत जाणाऱ्या) लोकसंख्येचे पोट भरण्यासाठी अन्नाची कमतरता ही भासणार याचे कारण म्हणजे शेतजमिनींचा कस कमी झालेला असेल, शेतजमीनीवर औद्योगिकरणामुळे कारखान्यांची पीके उत्पादित होत असतील आणि नैसर्गिक जंगलांचा नाश होऊन सिमेंटच्या इमारतींची नंदनवने फुललेली असतील. एक तुपाशी, एक उपाशी ही परिस्थिती प्रत्ययाला येईल ! जीवनोपयोगी वस्तूंचा तुटवडा, अन्नाचा दुष्काळ, प्रदूषणाचा सुकाळ निसर्ग असमतोल यामुळे, कॅन्सर, एडस् याहीपेक्षा नवनवीन भयानक महारोगांनी माणूस ग्रासला जाईल. तो व्याधिमुक्त होणार नाही.

भोगवादाच्या भोगांनी भारतीय समाज पोखरला जाईल. आज तरुणांमध्ये व्यसनाधीनता ही वाढत चालली आहेत त्यांच्या समोरील आदर्श भरकटलेले आहेत माणसातील स्वार्थीपणा बोकाळत चालला आहे. तो पूर्णतः आत्मकेंद्रित बनला आहे. मानवी मूल्ये पायदळी तुडवली जाताना पावलोपावली दिसतील हे सुद्धा भयानक आव्हान २१व्या शतकात आमच्यापुढे असेल. मनी, माफिया, मीडिया यांचे वर्चस्व भारतीय समाजावर असेल. सध्या राजकारणी व गुंड यांच्यात वाढत चाललेला स्नेह पाहता व दुर्दैवाने यात पोलीस सुद्धा सहभागी आहेत, त्यामुळे आज देशातील सर्वसामान्य जनता ही सदैव अजब त्रिवेणी संगमाविरुद्ध आवाज उठवू शकत नाही. कारण या देशातील सर्व सामान्य माणूस हा सदैव भयभीत आहे की ज्याला जगण्यासाठी खंडणी द्यावी लागते तर, मरण्यासाठी टॅक्स भरावा लागतो. तेव्हा अशा प्रकारचे जगणे म्हणजे अराजकताची नांदी होय. ही नांदी प्रसरली असेल.

आमच्या समाजात चार प्रवाह सतत वाहतच आहेत एक अतिउच्च बुद्धिमानांचा वर्ग की जो कधी समाजात मिसळत नाही, दुसरा मोठ्या उद्योगपतींचा की ज्याला पैशांशिवाय समाजाशी बांधिलकी नसते. तिसरा मध्यम वर्ग की जो केवळ मताचा शिक्का ठोकण्यापलीकडे काही करत नाही आणि 'मालूम नही सरकार क्या चीज होती है' असे म्हणणारा दलित पीडित वर्ग. हे चार प्रवाह जो पर्यंत समाजात एकत्रित येत नाहीत, मिसळत नाहीत तोपर्यंत प्रत्येक आव्हान हे आम्हाला खुणावतच राहणार आहे.

(पान क्र. ३५ वर)

# यशाच्या विविध रंगी छटा

प्रा. मोहन पाठक

विद्या प्रसारक मंडळाच्या 'दिशा' चे हे तिसरे वर्ष. या वर्षात मागील अंकात केलेल्या आवाहनानुसार विविध विषयांवरील दर्जेदार लेखन देण्यासाठी दिशा प्रयत्न करणार आहे.

आमच्या विद्याप्रसारक मंडळाचे महाविद्यालय परिसर व शालेय परिसर असे दोन ठळक भाग आहेत. या परिसरातील विविध घडामोडींचा परामर्श घेण्यासाठी अनेकांचे सहकार्य मिळत असते. ते असेच मिळत राहील हा विश्वास आहे.

**प्राथमिक शाळा**



प्रसाद बागवे

डॉ. बेडेकर विद्यामंदिरच्या प्राथमिक विभागातील प्रसाद बागवे याच्या यशाचा आम्हाला अभिमान आहे. इयत्ता चौथीतील प्रसाद टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या गणित विषयाच्या परीक्षेत १००% गुण मिळवून महाराष्ट्रात पहिला आला. गणिताची विलक्षण आवड असलेल्या प्रसादला सौ. भंडारेबाईंनी व त्याच्या वडिलांनी मार्गदर्शन केले. गणिताशिवाय क्रिकेट खेळण्यास खूप आवडते. गेली दोन वर्षे त्याला श्री. अवि सुळे व शराफत बापे यांचे क्रिकेटचे मार्गदर्शन मिळत आहे.

**माध्यमिक शाळा**

डॉ. बेडेकर विद्यामंदिरमधील आणखी तीन विद्यार्थ्यांना महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षेत अतुलनीय यश मिळाले. एप्रिल ९८ मध्ये झालेल्या या परीक्षेत कु. सुदीप कामत हा १२५ रु. ची शिष्यवृत्ती मिळवून ठाणे जिल्ह्यात प्रथम आला.

विनायक प्रसाद, सुरेश पाखरे (राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत १८ वा) तर कपिल एडके (राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत २० वा) आला. सुदीपला याच शाळेतील शिक्षिका अपर्णा भट यांचे मार्गदर्शन मिळाले होते.

**कला वाणिज्य महाविद्यालय**

महाविद्यालय परिसरातील कला वाणिज्य महाविद्यालयाचा पदवी परीक्षांचा निकाल लागला. यात तृतीय वर्ष कला शाखेतील दीपाली भिडे ४२४ गुण मिळवून महाविद्यालयात सर्वप्रथम आली. ४०७ गुण प्राप्त करणारी ज्युडेलिन डिसेल्वा महाविद्यालयात दुसरी तर ४०२ गुण मिळवणारी श्वेता लिखिते तृतीय आली. महाविद्यालयाचा निकाल ८८.७८% लागला तर विद्यापीठाचा निकाल ८१.८६% लागला.

वाणिज्य शाखेत ५२० गुण मिळवून नीलेश कवडे महाविद्यालयात प्रथम, परमेश आडारकर (५१५गुण) द्वितीय, तर उज्वला गुजराथी (५११गुण) महाविद्यालयातून तिसरी आली. महाविद्यालयाची टक्केवारी ६४.२७% इतकी आहे. तर विद्यापीठाची ५१.०६ %.

**गुरुपौर्णिमा**

गुरुशिष्याचे नाते आणि परंपरा हे भारतीय संस्कृतीचे विशेष अंग आहे. आजची तरुण मुले गुरुला मान देत नाहीत असे म्हणणारे बरेच असतात. पण

आपल्या कला वाणिज्य महाविद्यालयात गुरुपौर्णिमा ज्या पद्धतीने साजरी झाली ती अतिशय हृद्य होती.

महाविद्यालयातील विद्यार्थिप्रतिनिधी सकाळी लवकर आले व त्यांनी विद्यादेवतेची मनोभावे पूजा केली. नंतर प्राचार्यांना पुष्पगुच्छ, पेढे व भेटवस्तू देऊन त्यांचे आर्शीवाद घेतले. या प्रसंगी प्राचार्य स.वा. गोखले म्हणाले, 'राजकारणापासून व गुंड प्रवृत्तींपासून दूर राहून आदर्श नागरिक होण्याचा प्रयत्न करा. कोणत्याही आमिषाला बळी पडू नका.



गुरुवर्य गोखलेसरांचे आर्शिवाद घेताना
गणेश खराडे

यानंतर विद्यार्थिप्रतिनिधी गणेश खराडे याने प्रत्येक वर्गात जाऊन गुरूचे जीवनातील मोठेपण विषद करून सांगितले. महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना विद्यार्थ्यांनी गुलाबपुष्प व भेटवस्तू देऊन आपल्या मनातील आदरभाव प्रकट केला. सदर कार्यक्रमासाठी गणेश खराडेखेरीज भूपेंद्र नाईक, वैजयंती सामंत, संतोष जयस्वाल, शेफाली पाटील, विशाल गजारे, संदीप जाधव, अमित राजकुवर, नीलेश कोळी, विनिता शर्मा, पल्लवी आठवले, विद्युत पोंक्षे, सचिन ससाणे, मंदार सावंत या विद्यार्थ्यांनी विशेष प्रयत्न केले.

## अभिमान वाटावा असे यश।

आमच्या महाविद्यालयाचे ग्रंथपाल मोहन पाठक यांनी एम्.एल्.आय्.एस्. (मास्टर्स ऑफ लायब्ररी अँड इनफर्मेशन सायन्स) ही पदवी यंदा प्राप्त केली. या परीक्षेत विद्यापीठात प्रथम येण्याचा बहुमान त्यांना प्राप्त झाला. महाविद्यालयातर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन !

व्यवसाय संभाळून व अनेक अडचणींवर मात करून त्यांनी हे यश संपादन केले आहे. या परीक्षेसाठी लागणाऱ्या संशोधनप्रबंधासाठी त्यांनी 'विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकासात ग्रंथपालाची भूमिका' हा विषय घेतला होता. मुंबई विद्यापीठाचे निवृत्त ग्रंथपाल व मुंबईच्या प्रसिद्ध एशियाटिक लायब्ररीचे विद्यमान ग्रंथपाल डॉ. शरदच्चंद्र गणपुले यांचे त्यांना संशोधनात मार्गदर्शन मिळाले. ''आपल्या यशाचे खरे श्रेय अनेकांचे आहे, विद्याप्रसारक मंडळ, ग्रंथालयातील सहकारी, विद्यापीठातील शिक्षक, या व्यवसायातील अनेक मित्र याच बरोबर घरातून सहकार्य यामुळे आपण थोडेफार करू शकलो,'' अशी भावना त्यांनी माझ्याजवळ बोलताना व्यक्त केली.

'दिशा' मासिक 'सन्मित्र' दैनिक यांचे नियमीत लेखक, भारतीय शिक्षण मासिकाचे संपादक असणारे श्री. पाठक आमच्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत याचा आम्हाला विशेष अभिमान आहे.

सी.जी.पाटील
प्राचार्य,
बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील वनस्पतिशास्त्र विभागाचे प्रमुख व प्रपाठक डॉ. जी.टी. दाभाडे यांच्या 'मॉसेस ऑफ खंडाला अँड महाबळेश्वर इन द वेस्टर्न घाट्स् (इंडिया) ' या संशोधन ग्रंथाचे अलिकडेच मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नरेश चंद्रा यांच्या हस्ते प्रकाशन झाले. गेली ३३ वर्षे डॉ. दाभाडे हे या विषयावर संशोधन करीत असून या विषयावर पुणे विद्यापीठाची पीएच्.डी. ही पदवी त्यांना मिळाली होती. त्यांचे पीएच.डी.चे मार्गदर्शक टी. एस्. महाबळे होते.

बांदोडकर विज्ञान महाविद्यालयात डॉ. दाभाडे १९७१ पासून आहेत. त्यांच्या नावावर ३० संशोधन निबंध असून त्यांनी पीएच.डी. साठी १२, एम.फिल. साठी २ तर एम.एस. साठी १ विद्यार्थी यांचे मार्गदर्शक म्हणून काम केले आहे. प्राचार्य सी.जी. पाटील यांनी डॉ. दाभाडे यांचे अभिनंदन केले आहे.

## तंत्रनिकेतन

तंत्रनिकेतन रसायनशास्त्र विभागातील प्रा. विद्याधर वालावकर यांनी जूनपासून महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी 'कॉलेज कॅम्पस्' या नावाचे मासिक चालू केले आहे. ते या मासिकाचे संपादक असून प्रीतीदा व्राप या कार्यकारी संपादक आहेत.

प्रा. विद्याधर वालावकर बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी असून पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात ते भरीव काम करतात.

• • •

(पान क्र. ३२ वरून)

## २१ व्या शतकातील भारतापुढील आव्हाने

आज भारताच्या अर्थव्यवस्थेला मुक्त अर्थव्यवस्थेशी कार्यक्षम परदेशी कंपन्यांशी सामना करावयाचा आहे. त्यासाठी आर्थिक क्षमता वाढविणे, अवजड उद्योगांचा पाया भरभक्कम करणे गरजेचे आहे. पर्यावरणाचा ढळता समतोल सावरण्यासाठी हरित क्रांती कडे लक्ष देणे अत्यावश्यक आहे. आज असे म्हटले जाते कि मेरा देश महान. तेव्हा अशा स्वार्थी, बेइमान देशद्रोहींना रोकणे हे इतर आव्हानापेक्षा भारता पुढील सर्वात मोठे आव्हान आहे कारण

बरबाद गुलिस्ताँ करने को
एक ही उल्लू काफी है।
अंजाम-ए-गुलिस्ताँ क्या होगा
यहाँ हर शाखपे उल्लू बैठा हैं।

आज मेळघाटात कुपोषणाने कित्येक जीव बळी जातायत तर दुसरीकडे अन्नामध्ये विषबाधा होते. गंगाजलाच्या शुद्धीकरणासाठी क्लिनगंगा प्रोजेक्ट राबवावा लागतो अशा परिस्थीतीतही आपण मात्र फिनिक्स् पक्षी होण्याची जिद्द बाळगतो. जिद्द जरी चांगली असली तरी त्यापाठीमागच्या वास्तवापासून दूर जाऊन चालणार नाही. दधीची ऋषींनी इंद्राच्या वज्रासाठी आपली हाडे दिली तेव्हा अशी तयारी असणारी जनता निर्माण करण हे भविष्यातील आह्वान आहे. डॉ. आंबेडकर यांनी देशाची घटना सादर करतानाच म्हटले होते की " निसरड्यावाटेवरून घसरून पडणे धोक्याचे असते पण त्याहीपेक्षा दरीत कोसळणे अधिकच धोक्याचे असते." आम्ही एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे आहोत म्हटले तर उगवणारी पहाट आहे. अन्यथा काळोखी रात्र. कुठे जायचे हे ज्याच्या त्याच्या हाती आहे. तेव्हा २१ व्या शतकाच्या पार्श्वभूमीवर मला सांगाव्याश्या वाटतात त्या माधव ज्युलियन यांच्या ओळी

'पूर्वजांची थोरवी ठेवा मनीं'

• • •